अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. १८ ऑगस्ट २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३१९ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## बदनामी करण्याची धमकी देत पाच लाख रूपयांची मागणी; खंडणीचा गुन्हा

सुराज्य/बार्शी

जमीन बळकावल्याचा खोटा आरोप करत जमीनींचे प्रकरण मिटवून घेतो असे म्हणत येथील राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते विश्वास बारबोले यांना पाच लाख रूपयांची खंडणी मागितल्याप्रकरणी एकावर बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शैलेश शरणाप्पा मनसाखरे रा. सोलापूर रोड, बार्शी असे गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींचे नांव आहे. विश्वास बारबोले यांनी याप्रकरणी शहर पोलीसांत दि. १५ रोजी फिर्याद दिली आहे.

फिर्यादी विश्वास बारबोले तसेच त्यांचे भाऊ व मयत वडिल यांच्यावर यातील आरोपी शैलेश मनसाखरे हा त्याची ५३ एकर जमीन बळकावल्याचा खोटा आरोप अनेक वर्षापासून करत होता. त्याने अनेक वेळा तहसीलदार समोर व पोलीस स्टेशन समोर जमीन परत मिळावी म्हणून उपोषणे केली. हे जमीनींचे प्रकरण मी मिटवून घेतो. मला पाच लाख रूपये तुम्ही दया असे म्हणून पैशाची मागणी केली. नाहीतर मी तुमच्या घरासमोर उपोषणाला बसून तुमची बदनामी करतो अशी धमकी दिली. फिर्यादींचा जमीनींचे जागेबाबत काडीचाही संबंध नाही. फिर्यादी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुक्यातील प्रमुख म्हणून सध्या काम करत आहेत. मला दोन दिवसात पैसे नाही मिळाले तर तुमच्या घराजवळ उपोषणाला बसून तुमची बदनामी करतो. मग त्यापुढील होणाऱ्या परिणामास तुम्ही जबाबदार राहाल असे म्हणाला. अशा आशयाची फिर्याद दिली आहे.

# पावसाची दांडी, पिकांची नासाडी शेतकऱ्यांची उडालीय घाबरगुंडी

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**तब्बल पंधरा-वीस दिवस झाले सोलापूर जिल्ह्यात पावसाने दडी मारली आहे. पावसाअभावी उगवलेली खरीप पिके करपू लागली आहेत. जनावारांच्या चाऱ्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. जिल्ह्यातील नद्या,नाले,ओढे कोरडे पडू लागले आहेत. भीमा-सीना काठी तसेच रानातील वस्त्यांवर पाणी टंचाईचा प्रश्न उग्र बनत चालला आहे.उजनी धरणातील पाण्याची अवस्था बिकटच आहे. उजनी ७० टक्के भरल्याखेरीज शेतीसाठी पाणी न देण्याचे जलसंपदा विभागाचे धोरण आहे. पुणे जिल्ह्यातही पाऊस गुल झाल्याने सध्यातरी उजनी भरेल ही आशा मावळली आहे. शेतकरी वर्ग धास्तावला आहे. एकूणच ग्रामीण भागातील हे चित्र पाहिल्यानंतर सोलापूर जिल्ह्याला अवर्षण स्थितीच्या झळा बसू लागल्या आहेत. जिल्ह्यातील काही आमदारांनी हा प्रश्न शासन दरबारी नेला असून त्यांच्या प्रयत्नांना कितपत यश मिळते, हे पहावे लागेल.**

सोलापूर जिल्ह्यात आर्द्रा, पुनर्वसू आणि पुष्य या तीन नक्षत्रांचा पाऊस चांगला पडला. दरम्यान खरीप हंगामातील उडीद, तूर, बाजरी, मका, सोयाबिन या पिकांच्या पेरण्या शेतकऱ्यांनी उरकून घेतल्या. पुनर्वसू आणि पुष्य या दोन नक्षत्रांमध्ये दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ या तालुक्यांमध्ये अतिवृष्टी झाली. शेतातील सरींमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले. त्यामुळे उगवणीला आलेल्या खरीप पिकांची हानी झाली. शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले.

गेल्या पंधरा-वीस दिवसांपासून जिल्ह्यात पावसाचा एकही थेंब पडलेला नाही.आश्लेषा नक्षत्र कोरडेच गेले.मघा नक्षत्राचे चिन्हही बरोबर दिसेना.'पडतील मघा तर घरात बसा,नाही तर ढगाकडे बघत रहा', अशी एक म्हण या नक्षत्राविषयी सांगितली जाते. सध्या ढग येतात आणि जातात. त्यामुळे बिचाऱ्या शेतकऱ्यांना आकाशाकडे बघत बसण्याचा बाका प्रसंग ओढवला आहे. पावसाअभावी साऱ्या जिल्ह्यात अवर्षण स्थिती निर्माण झाली आहे.

## सोलापूर जिल्ह्याला बसतायेत अवर्षणाच्या झळा



### मुख्यमंत्र्यांशी चर्चा करणार

अजितदादा पवार आमदारांच्या शिष्टमंडळाशी बोलताना म्हणाले की, मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सविस्तर चर्चा करेन आणि येत्या दोन-तीन दिवसात उजनीतून पाणी सोडण्याविषयी सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असा शब्द दिल्याचे आ. बबनराव शिंदे यांनी सांगितले.

### सारी भिस्त उजनीवर,पण...

सोलापूरसह जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याची सारी भिस्त उजनीवर अवलंबून असते. पण धरणात केवळ १३ टक्के पाणी साठा प्लसमध्ये आहे. आताच पाणी सोडत राहिल्यास पुढच्या काळात गहन स्थिती उद्भवल्यास काय करायचे? हा प्रश्न जलसंपदा विभागाला भेडसावत आहे. पुणे जिल्ह्यातील धरणे ८० टक्के भरली आहेत.अजून पाऊस पडत राहिला असता तर वरून उजनीला पाणी मिळाले असते परंतु पुणे जिल्ह्यातही पाऊस गुल झाला आहे. पाऊस पुन्हा कधी सक्रिय होणार याची प्रतिक्षा लागून आहे.

### अजितदादांना साकडे...

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी भेटून व सविस्तर चर्चा करून उजनी धरणातून कालवा, बोगदा, सीना माढा व दहिगाव उपसा सिंचन योजनेद्वारे शेतीसाठी पाणी सोडण्याचा सकारात्मक निर्णय येत्या दोन-तीन दिवसात निश्चित घेतला जाईल, असे ठाम आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले असल्याची माहिती आमदार बबनराव शिंदे यांनी दिली आहे. सध्या सोलापूर जिल्ह्यात सर्वत्र अवर्षणग्रस्त परिस्थिती असून उजनी धरण विसर्ग स्त्रोतावर अवलंबून असलेल्या लाखो एकर लाभक्षेत्रातील ऊस, फळबागा, चारा वैरण अशी उभी पिके पाण्याअभावी जळून जाऊ लागली आहेत व शेतकरी प्रचंड धास्तावलेला आहे. सध्या उजनी धरणात १४ टक्के उपयुक्त पाणी असून ७.२२ टीएमसी पाणीसाठा तयार झालेला आहे. आगामी दोन ते अडीच महिन्याच्या पावसाळ्यात धरणात आणखीन जादा पाणी येईल तेव्हा येईल परंतु सोलापूर जिल्ह्यासाठी कालवा, भीमा- सीना जोड कालवा (बोगदा) सीना माढा व दहिगाव उपसा सिंचन योजना याद्वारे तातडीने पाणी सोडून उभ्या पिकांना जीवदान मिळावे म्हणून आमदार बबनराव शिंदे, आमदार संजयमामा शिंदे, आमदार यशवंत माने, माजी आमदार राजन पाटील, कल्याणराव काळे आदी मान्यवरांनी अजितदादा यांची मुंबईमध्ये भेट घेतली.

### ऊस लागवड थांबली...

सोलापूर जिल्ह्यातील उसाच्या पिकाचे भवितव्य उजनीच्या पाण्यावरच अवलंबून असते.धरणात पाणी नाही,नद्या आटू लागल्या आहेत.पाऊस नाही.त्यामुळे पुढे पाण्याची अडचण येईल म्हणून ऊस उत्पादक शेतकरी ऊस लावण्याचा नाद सध्यातरी सोडून दिला आहे.आगामी काळात पूर्वा,उत्तरा आणि हस्त या तीन नक्षत्रांचा मुबलक पाऊस झाल्यास आणि धरण १०० टक्के भरल्यानंतरच ऊस लागण करण्याला वेग येणार आहे अन्यथा नाही. हीच स्थिती राहिली तर गहू,ज्वारी, हरभरा, करडई ही पिके घेण्याशिवाय गत्यंतर नाही.

## नायब तहसीलदार सह दोन व्यक्तींना लाच घेताना अटक

सुराज्य/पंढरपूर

दहा गुंठे जमीन खरेदीस परवानगी मिळवून देण्यासाठी २० हजार रुपयाच्या लाचेची मागणी करणाऱ्या पंढरपूर प्रांत कार्यालयातील नायब तहसीलदार व दोन खासगी इसम यांना १५ हजार रुपयाची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहात अटक केली.



या प्रकरणी प्रांत कार्यालयातील नायब तहसीलदार आप्पासाहेब शिवाजी तोंडसे यांच्यासह खासगी इसम तुकाराम बाळकृष्ण कदम व सचिन विठ्ठल बुरांडे दोघेही रा. गौतम विद्यालय जवळ या तिघांना अटक करण्यात आली आहे.

घटनेची माहिती अशी की, तक्रारदारास आपल्या शेता शेजारील दहा गुंठे जमीन खरेदी करायची आहे. मात्र दहा गुंठे जमीन खरेदीसाठी प्रांत अधिकारी यांची परवानगी लागते. याबाबत सदर व्यक्तीने रीतसर प्रांत कारल्यात अर्ज केला होता मात्र नायब तहसीलदार तोंडसे यांनी जमीन खरेदीची परवानगी मिळवून देण्यासाठी २०००० रुपये लाचेची मागणी केली तडजोडीअंती पंधरा हजार रुपये देण्याचे ठरले होते. मात्र तक्रारदाराने याबाबत सोलापुर येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागात तक्रार केली. त्यानुसार पूर्ण चौकशी करून लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी तोंडसे यासह दोन खासगी व्यक्तींना १५ हजाराची रुपयाची लाच घेताना अटक केली. याबाबत रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

कारवाई लाचलुचपत विभागाचे पोलीस निरीक्षक उमाकांत महाडिक यांच्यासह शिरीष कुमार सोनवणे, अतुल घाडगे, सलीम मुल्ला, राहुल गायकवाड यांनी केली.

## बस स्थानकातील फलाटमध्ये शिरली एस टी बस

### पंढरपुरात चालकाचे नियंत्रण सुटले; चार प्रवासी जखमी

सुराज्य/पंढरपूर

शहरातील एसटी चालकाचे नियंत्रण सुटल्याने नवीन बस स्थानकातील फलाटवरमध्ये एस टी बस शिरली आहे. यामुळे फलाटवर एस टी च्या प्रतीक्षेत बसलेले चार प्रवासी जखमी झाले आहेत. त्यातील एक महिला गंभीर झाली आहे . ही घटना गुरुवारी सकाळी साडे सातच्या सुमारास घडली आहे.



राज्य परीवहन पंढरपूर आगाराची एम एच २० बी एल ४२१४ या क्रमांकाची विना वाहक एस टी बस पंढरपूर कडून सोलापूर नेहण्यासाठी शब्बीर नासीर नदाफ (वय ३७, रा. आंबेडकर नगर, गोपाळपूर नाक्याच्या पाठीमागे, पंढरपूर) घेऊन बस स्थानकावर घेऊन येत होते. मात्र त्या एस टी बस वरील बसचालक शब्बीर नासीर नदाफ यांचे नियंत्रण सुटल्याने ती एस टी बस बसस्थानकामधील ९ व १० क्रमांकाच्या फलाटमध्ये शिरली. यावेळी एस टी बसच्या प्रतीक्षेत बसलेल्या चार प्रवाशांना धडक बसली आहे.

यामध्ये कमल विठ्ठल कुंभार ( वय ७२), पोपट जनार्धन गुटाळ (वय ६४), शालन पोपट गुटाळ ( वय ५५), सुप्रिया गणेश कुंभार ( वय ३०, रा. कुंभार गल्ली, भजन दास चौक, पंढरपूर) जखमी झाले आहेत. यामध्ये कमल विठ्ठल कुंभार यांचे दोन्ही पाय गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हा अपघात एसटीबस चा ब्रेक फेल झाल्याने झाला असल्याचे नदाफ यांनी सांगितले.

## कर्नाटकातील विवाहित इसमाची सोलापुरात गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

कर्नाटकात राहणाऱ्या एका ५० वर्षीय इसमाने उत्तर सोलापुरातील कोंडी परिसरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना गुरुवारी सकाळी उघडकिस आली.

मल्लप्पा जेजप्पा यलवर (वय ५० रा. नालवार स्टेशन जवळ, ता.चितापूर जि. कलबुर्गी) असे आत्महत्या केलेल्या इसमाचे नाव आहे. त्याचा मृतदेह आज सकाळी कोंडी येथील सुभाष देशमुख यांच्या शेतातील चिंचेच्या झाडाला गमजाने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. याची माहिती मिळाल्यानंतर तालुका पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. त्यावेळी त्याच्या खिशात डायरी सापडली. त्यावरून मयत आणि नातेवाईकांची ओळख पटली .

मयत मल्लप्पा यलवर हा विवाहित असून त्याच्या पश्चात पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. त्याच्या डोक्यावर परिणाम झाल्याने तो चार दिवसापासून घरातून निघून गेला होता. असे पोलिसांच्या प्राथमिक तपासात निष्पन्न झाले.

## खिसे तपासल्यानंतर नोकराची चोरी उघड, मालकिणीच्या बोटाला चावा घेवून पसार

सुराज्य/बार्शी

दहा वर्षापासून कामास असलेल्या एका नोकराने मालकिणीचे अडीच तोळयाचे गंठण चोरले. खिसे तपासल्यानंतर चोरी उघडकिस आली. त्यानंतर बोटाला चावा घेवून मालकिणीला मारहाण करत त्यांची मोटारसायकल व मोबाईल घेवून नोकर पसार झाला. बार्शी शहरातील कासारवाडी रोडवरील साईनगर भागात दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास ही घटना घडली. मालकिणीने दिलेल्या फिर्यादीवरून नोकर सोमनाथ कल्याण टेके (वय ३० रा. अलिपूर रोड, भराडिया प्लॉट, बार्शी) याच्याविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

यातील फिर्यादी मनिषा यशवंत जाधव (रा. साईनगरी, कासारवाडी रोड बार्शी) यांचे पती शेळीपालनचे शिक्षक असून खाजगी नोकरी करतात. त्यांच्या घरी घरगुती कामासाठी आरोपी सोमनाथ हा दहा वर्षापासून काम करत आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

## घरासमोरील पाण्याच्या टाकीत बुडून सात वर्षाच्या मुलाचा मृत्यू

सुराज्य/अक्कलकोट

बबलाद (ता. अक्कलकोट) येथील घरासमोरील एका निळया रंगाच्या पाण्याच्या टाकीत पडुन बुडुन सात वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला. ही घटना गुरूवारी सकाळी साडेनऊ ते दहा वाजण्याच्या दरम्यान घडली. बसवराज नाना नंदगेरी (वय ७ रा. बबलाद) असे मयत मुलाचे नाव आहे. गुरूवारी सकाळी साडेनऊ वा.चे ते १० वा.चे दरम्यान गुरूनिंगप्पा यांचा पुतण्या बसवराज हा खेळत असताना घरासमोरील पाण्याच्या टाकीतील पाण्यात पडला. त्यातच बूडून त्याचा मृत्यू झाला. पुढील तपास पोहेकॉं कोळी हे करीत आहेत.

## फरार आरोपी वर्षानंतर अटकेत

सुराज्य/सोलापूर

एक वर्षा पासून फरार असलेला आरोपी व पीडीत बालिकेचा शोध घेवून अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने विजापूर नाका पोलीस ठाण्यात हजर केले.

या घटनेच्या हकीकत अशी की,१५ जुलै२०२२ रोजी विजापूर नाका पोलीस ठाण्यात अल्पवयीन बालिकेस संशयीत आरोपी किरण मंगसाले (रा. शांतीनगर,सोलापूर) याने कशाचेतरी अमिष दाखवून पळवून नेल्या बाबतचा गुन्हा दाखल झाला होता.त्यावेळी विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या पथकाने त्याचा शोध घेतला असता,तो सापडत नसल्याने हा गुन्हा हा दि.१४ मार्च २०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाकडे वर्ग करण्यात आला होता.गुप्त बातमीदारांनी दिलेल्या माहितीनुसार संशयित आरोपी हा पुणे येथे असल्याचे आढळल्याने पथकाने त्यास शिताफीने संभाजी चौक,गुड निवास केशव नगर,मुंडवा पुणे येथून ताब्यात घेवून विजापूर नाका पोलीस ठाणे येथे हजर केले.ही कामगीरी पोलीस आयुक्त डॉ.राजेंद्र माने,पोलीस उप- आयुक्त डॉ.दिपाली काळे,सहा.पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षा कडील पो.नि वैष्णवी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महादेव बंडगर,तृप्ती मंडलिक,रमादेवी भुजबळ,उषा मळगे,सीमा खोगरे,गोरे,गायकवाड,पाटील यांनी उत्कृष्टपणे बजावली.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



कारणं कमी, विनाकारण जास्त आहे !!!

कल्याण
278-74-248

मुंबई
457-67-250

## विभागीय आयुक्त सौरभ राव, म्हाडाचे सीईओ जैस्वाल सोलापुरात

### रे- नगरसह, अक्कलकोट, पंढरपूर विकास आराखड्याची करणार पाहणी

सुराज्य/सोलापूर

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे घरकूल वितरणाच्या कार्यक्रमासाठी येणार असल्याने त्यांच्यासाठीही करण्यात येणाऱ्या दोन नवीन रस्त्याच्या कामांचा आढावा सौरभ राव आणि संजिव जैस्वाल घेणार आहे. पंतप्रधान मोदींच्या दौऱ्यांचे नियोजन यावेळी अधिकाऱ्यां समवेत केले जाणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी विभागप्रमुखांची बैठक घेऊन आढावा घेतला.

पंतप्रधान आवास योजनेतून असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी कुंभारी परिसरात रे नगर नावाने सुमारे ३० हजार घरांचा प्रकल्प साकारत आहे. नोव्हेंबर मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पहिल्या टप्प्यातील १५ हजार घरकुलांची चावी लाभार्थ्यांना दिली जाणार आहे. याची पाहणी करण्यासाठी विभागीय आयुक्त सौरभ राव आणि म्हाडाचे सिईओ संजिव जैस्वाल सोलापूर दौऱ्यांवर येणार आहेत. रे नगरला भेट देऊन पाहणी करणार आहेत. तसेच पंढरपूर आणि अक्कलकोट विकास आरखड्याची पाहणी देखील करणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिली.

कुंभारी परिसरात रे नगर नावाने सुमारे ३० हजार घरांचा प्रकल्प साकारत आहे. सध्या १५ हजार घरे पूर्णत्वास आली आहेत. उर्वरित घरांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. पहिल्या टप्प्यातील १५ हजार घरांच्या चाव्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नोव्हेंबर महिन्यात लाभार्थ्यांना देण्यात येणार आहेत. त्यादृष्टीने सर्व कामे युध्दपातळीवर करण्यात येत आहेत.

या कामाची पाहणी आढवा घेण्यासाठी विभागीय आयुक्त सौरभ राव आणि म्हाडाचे मुख्यकार्यकारी अधिकारी संजिव जैस्वाल शुक्रवारी सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत. सकाळी १० वाजता सोलापुरात आल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकारींची बैठक घेऊन सोलापूर जिल्ह्यातील विकास कामांचा तसेच रे नगरमध्ये करण्यात येत असलेल्या सोयींसुविधा, रस्ते, पाणी रस्ते या विकासकामांचा आढावा घेणार आहेत. त्यानंतर सकाळी ११ वाजता कुंभारी येथील घराची आणि सोयींसुविधांची पाहणी करणार आहेत. घरकुलाचे मुख्यप्रवर्तक आडम मास्तर तसेच लाभार्थ्यांची संवाद साधणार आहे. त्यानंतर अक्कलकोट आणि पंढरपुरला जाऊन विकास आराखड्याची प्रत्यक्ष घटना स्थळी जाऊन पाहणी करणार आहेत. या दौऱ्यांची लगबग सध्या जिल्हाधिकारी कार्यालयात चालू आहे.

सोलापूर जिल्ह्यामध्ये सध्या पाच ठिकाणी वाळू डेपो आहे. सध्या मोठ्या प्रमाणात वाळू मागणी वाढली आहे. मात्र वाळू मिळत नसल्याच्या तक्रारी आहे. त्यामुळे तब्बल ४० ठिकाणी वाळू डेपो उघडले जाणार आहे. प्राथमिक सर्व्हे झाला आहे. थर्ड पार्टी तांत्रिक सर्व्हे चालू आहे. त्यानंतर इतर विभागाच्या परवानगी घेऊन तो प्रस्ताव शासनाकडे सादर केला जाणार असल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

### शनिवारी जिल्हाधिकारी घेणार बैठक

सोलापूर जिल्हातील विकास कामांचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे सर्व विभागिय अधिकारी, तहसिलदार यांची शनिवारी बैठक घेणार आहे.

# ईडीचा बडगा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या साडे नऊ वर्षांच्या काळात ईडी म्हणजे काय? आणि ईडीचा धसका काय असतो? हे देशाला दाखवून दिले. ईडी म्हटल्यानंतर भल्या-भल्यांची म्हणजे या देशात राहून बेहिशोबी मालमत्ता ज्यांनी ज्यांनी म्हणून गोळा केली आहे, अशांची पाचावर धारण बसली होती. पुढाऱ्यांनी तर जबर धसकाच घेतला होता. देशाला सीबीआय ही एक तपास यंत्रणाच माहीत होती मात्र, आता ईडी म्हटल्यानंतर अख्खा देश जागा होतोय. 'इन्फोर्समेंट डिरेक्टोरेट' असे ईडीचे लाँगफार्म आहे. मराठीत सक्त वसुली संचालनालय, असे नामकरण करण्यात आले आहे. काळा पैसा आणि बेनामी मालमत्ता गोळा करणाऱ्यांवर ईडीची करडी नजर असते. मागील ६ वर्षांत ईडीकडून विविध प्रकरणांमध्ये तब्बल १ लाख १५ हजार कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. ईडी म्हणजेच सक्तवसुली संचालनालयाचे नाव जरी घेतले तरी अनेकांचे धाबे दणाणतात. विरोधकांनी तर सत्ताधाऱ्यांकडून ईडीचा गैरवापर होत असल्याचा ठपकाच लावलेला आहे. गेल्या काही वर्षांमध्ये ईडीच्या कारवायांमध्ये झालेली वाढ ही सत्ताधाऱ्यांकडून विरोधकांच्या विरोधाच रचण्यात आलेले कटकारस्थान असल्याचे वारंवार बोलले जाते. ईडी ही दहशतवादी संघटना असल्याचे बेधडक विधान संजय राऊत यांनी केले होते. मागील ६ वर्षांत ईडीकडून विविध प्रकरणांमध्ये तब्बल १ लाख १५ हजार कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. तर एकूण ५ हजार ९५ ईसीआयआर म्हणजेच प्राथमिक गुन्ह्यांची देखील नोंद करण्यात आलेली आहे तसेच, देशभरामधून ईडीने आत्तापर्यंत विविध गुन्ह्यांमध्ये ५३१ लोकांना अटक केली आहे. महत्त्वाची बाब ईडीची सर्वाधिक धास्ती ही विरोधातील नेत्यांनी घेतली आहे. त्यामुळे याबाबत समोर आलेल्या माहितीनुसार १७६ राजकिय नेत्यांविरोधात ईडीकडून आत्तापर्यंत गुन्हे नोंदविले आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील छगन भुजबळ, संजय राऊत, अनिल परब, नवाब मलिक, अनिल देशमुख तसेच राज्यातील अन्य महत्त्वांच्या नेत्यांचा समावेश आहे. त्यामुळे आता ईडीची सर्वाधिक भीती असलेल्या विरोधकांवर अद्यापही टांगती तलवार आहे. तर ईडीचे लक्ष आजही देशातील अनेक आमदार, खासदार व माजी आमदार-खासदार, नेते यांच्यावर आहे.ईडीकडून समोर आलेल्या आकडेवारीनुसार, हजारांच्यावर असे अनेक जण आहेत, ज्यांच्यावर ईडीकडून गुन्ह्यांची नोंद करण्यात आलेली आहे. यामध्ये २५ प्रकरणांवर कोर्टातील सुनावणी पूर्ण झालेली आहे. तर २४ प्रकरणे अशी आहेत, ज्यांच्याबाबत कोणतेही गुन्हे सिद्ध झालेले नाहीत. ईडीकडून सर्वाधिक कारवाई ही मनी लाँड्रिंगच्या प्रकरणांमध्ये करण्यात येते. त्यामुळे याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मनी लाँड्रिंगचे ४५ प्रकरणे सिद्ध झालेली आहेत. ईडीकडून जप्त करण्यात येणाऱ्या मालमत्तांच्या कारवाईमध्ये पहिल्यांदा तात्पुरती जप्ती करण्यात येते. त्यानंतर पक्की जप्ती करण्यात येते. महत्त्वाची बाब म्हणजे ईडीचे अधिकारी जेव्हा कारवाई करतात, त्यावेळी जर गुन्हा करून मिळवलेल्या पैशांतून मालमत्ता खरेदी केली गेली असेल तर त्याची जप्ती होते. सुरुवातीला ही जप्ती तात्पुरती असते, पण ज्यावेळी गुन्हा सिद्ध होतो, त्याची पडताळणी होते, त्यानंतर त्या मालमत्तांची पक्की जप्ती केली जाते. अंमलबजावणी संचालनालय (ईडी) हे एक आर्थिक कायद्यांची अंमलबजावणी करणारी एजन्सी आणि भारतातील आर्थिक गुन्हेगारीविरुद्ध लढा देण्यासाठी जबाबदार असणारी आर्थिक गुप्तचर संस्था आहे. हा महसूल विभाग, अर्थ मंत्रालय, भारत सरकारचा एक भाग आहे. हे भारतीय महसूल सेवा, भारतीय कॉर्पोरेट कायदा सेवा, भारतीय पोलीस सेवा आणि भारतीय प्रशासकिय सेवेतील अधिकारी तसेच त्यांच्या स्वतःच्या संवर्गातील पदोन्नती अधिकारी बनलेले आहे. स्वातंत्र्यानंतर १९५७ मध्ये ईडीची स्थापना करण्यात आली. बेहिशोबी मालमत्ता गोळा करणाऱ्यावर वचक ठेवण्यासाठी ही एक चांगली तपास यंत्रणा आहे मात्र, यात संबंधितांना शिक्षा का होत नाही? हा भारतीयांच्या मनातला प्रश्न आहे. इतकरी संपत्ती जप्त केल्याचे ईडी सांगत असेल तर त्या संपत्तीचे पुढे काय झाले हेही देशाला कळायला हवे.




## राजकीय

# दिल्ली सरकारचे दात उपटले

दिल्लीमधील केजरीवाल सरकारचे अधिकार मर्यादित करणारे दिल्ली सेवा विधेयक राज्यसभेने संमत केले. राज्यसभेत सत्ताधारी पक्षापेक्षा विरोधी पक्षाच्या खासदारांची संख्या जास्त आहे. मोदी सरकारने मांडलेले विधेयक मंजूर होऊ नये, यासाठी विरोधी पक्षांनी आपली सर्व ताकद पणाला लावली होती. राज्यसभेत १३१ विरुद्ध १०२ मतांनी दिल्ली सेवा विधेयक संमत झाले. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीनंतर त्याचे कायद्यात रूपांतर होईल. केजरीवाल सरकारच्या मनमानी, भ्रष्टाचारी, बेकायदेशीर कारभाराला लगाम घालण्यासाठी विधेयक हे आणावे लागले, अशी भूमिका केंद्र सरकारने मांडली व दुसरीकडे विधेयक मंजूर होऊ नये म्हणून काँग्रेसने आम आदमी पक्षाला साथ दिली.

कोणतेही सरकार घटनेला बांधिल असते. घटनेच्या अधिन राहूनच सरकारला काम करावे लागते. सरकारला निश्चितच अधिकार असतात. पण त्याचबरोबर कर्तव्य भावनेने घटनेच्या चौकटीत नि:पक्षपणे काम करावे, असेही अपेक्षित असते. पण आपणच दिल्लीचे सर्वेसर्वा आहोत, असा अहंकार व हट्टीपणाने केजरीवाल सरकारला ग्रासले आहे. दिल्ली सेवा विधेयक संमत झाल्याने आता केजरीवाल सरकारचे नोकरशहांच्या नेमणुका व बदल्यांचे अधिकार संपुष्टात आले आहेत. ते अधिकार आता केंद्र सरकारकडे वर्ग झाले आहेत. दिल्ली सेवा विधेयक मंजूर झाल्यानंतर खरोखर दिल्ली सरकारचे काही औचित्य राहिले आहे का, असा प्रश्न निर्माण होतो. दिल्ली सरकार म्हणजे अरविंद केजरीवाल यांचे सरकार. केजरीवाल हेच आम आदमी पक्षाचा आणि दिल्ली सरकारचा चेहरा आहेत. दिल्लीच्या सातही लोकसभा मतदारसंघात २०१४ आणि २०१९ मध्ये भाजपचे खासदार निवडून आले. पण दिल्ली विधानसभा ताब्यात घेण्यास भाजपला जमलेले नाही. केंद्रात भाजप पण दिल्लीत आम आदमी पक्ष असा मतदारांनी कौल दिला आहे. दिल्लीकरांनी दिल्ली विधानसभा सलग तिसऱ्यांदा केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पक्षाकडे सोपवली आहे. दिल्ली सेवा विधेयकाने दिल्ली सरकारचे महत्त्वाचे अधिकारच केंद्राने काढून घेतले आहेत. म्हणूनच दिल्ली सरकारची अवस्था आता आजारी माणसासारखी झाली आहे. दिल्ली सरकारचे दातच केंद्राने उपटून टाकले आहेत.

दिल्ली सेवा विधेयकाने मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे पंख कापले आहेत. केजरीवाल सरकार आणि मोदी सरकार यांच्यात सतत वादावादी चालू असते. जरा संधी मिळाली की, केजरीवाल सरकार केंद्रावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न करतात. केंद्र सरकार आणि मोदी सरकार यांचे एकमेकांवर सतत आरोप चालू असतात. केजरीवाल तर दिल्लीच्या नायब राज्यपालांशी सतत भांडण उकरून काढत असतात. दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा नाही, याचे भान केजरीवाल यांनी ठेवले, तर अनेक कटू प्रसंग टळू शकतात. दिल्ली सेवा विधेयकाने केजरीवाल यांना त्यांची जागा दाखवून दिली आहे.



केजरीवाल हे मुख्यमंत्री असले तरी ते काही पूर्ण राज्याचे मुख्यमंत्री नाहीत. त्यांना नव्या विधेयकाने लक्ष्मणरेषा घालून दिली आहे. नवी दिल्ली ही देशाची राजधानी आहे.

जगातील अनेक लहान-मोठ्या देशांचे दूतावास राजधानी दिल्लीत आहेत. संसद भवन, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, एनएमडीसी, दिल्ली विकास प्राधिकरण, विमानतळ विकास प्राधिकरण, दिल्ली मेट्रो, दिल्ली पोलिसांचे मुख्यालय, पासपोर्ट कार्यालय, केंद्र सरकारची विविध मंत्रालयांची मुख्यालये, आकाशवाणी, दूरदर्शन केंद्र, दिल्ली कंटोन्मेंट, राष्ट्रपती निवासस्थान, पंतप्रधानांचे निवासस्थान, केंद्रीय मंत्र्यांची निवासस्थाने, आंतरराज्य बस स्थानक, रेल भवन, बहुतेक मोठ्या राजकीय पक्षांची मुख्यालये दिल्लीतच आहेत. राजधानीत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्था व संघटना आहेत. या सर्वांवर दिल्ली सरकारचा अधिकार चालणार, असे कसे गृहीत धरता येईल? दिल्लीत जगभरातील उच्चपदस्थांची तसेच राष्ट्रप्रमुखांची सतत ये-जा चालू असते. त्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाते. नवी दिल्लीत पायाभूत सुविधा अत्याधुनिक व अद्ययावत असल्याच पाहिजेत. काळानुसार पायाभूत सुविधांचा विकास होतच असतो. हे सर्व पूर्ण राज्याच्या दर्जा नसलेल्या दिल्ली सरकारचे काम नाही. दिल्ली सरकारमध्ये अनेक विभाग आहेत. जनतेच्या करातून दिल्ली सरकारला अमाप पैसा मिळतो. पण केजरीवाल सरकारच्या जाहिरातींवर तसेच आमदारांच्या वेतन व भत्त्यांवर वारेमाप खर्च होतो. मग हवेच कशाला दिल्ली सरकार, असा एक नवा वाद सुरू झाला आहे.

दिल्लीत महानगर परिषद अगोदरपासून होतीच. बगीचे, मोठे रस्ते, इस्पितळे, नागरी सेवा, वॉटर व सिव्हरेज बोर्ड हे पूर्वी महानगर परिषदेकडेच होते. ट्रान्स यमुना बोर्ड, स्लम बोर्ड, ग्रामीण बोर्ड, डीटीसी, देसू हे सर्व पूर्वी दिल्ली महानगर परिषदेच्या अधिकार कक्षेत होते. दिल्ली ही देशाची राजधानी आहे. गृह व नगर विकास खात्याचे अधिकार सुरुवातीपासून केंद्र सरकारकडे आहेत आणि तसे असणे गरजेचेही आहे. दिल्लीत असलेल्या विधानसभेला इतर राज्यांप्रमाणे दर्जा नाही. दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा देणे शक्य होणार नाही. विरोधी पक्षात असताना सारेच पक्ष दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा द्यावा, अशी मागणी करतात, पण केंद्रात सत्तेत आल्यावर या मागणीवर मूग गिळून बसतात. भाजपच्या निवडणूक जाहीरनाम्यातही दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा देण्याचे आश्वासन दिलेले आहे. पण हा पक्ष केंद्रात सत्तेवर आल्यावर दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा देणे व्यवहार्य नाही, हे भाजपला कळून चुकले. अरविंद केजरीवाल गेली नऊ वर्षे दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदावर आहेत. त्यांनी दिल्लीसाठी काय मोठे काम केले? हे दाखवता येत नाही. मोहल्ला क्लिनिक किंवा सुंदर चकाचक शाळांच्या इमारती ते दाखवतात. पण सरकार म्हणून हे काम पुरेसे नाही. नऊ वर्षांत मुख्यमंत्री म्हणून केजरीवाल यांची महत्त्वाकांक्षा खूप वाढली आहे. आम आदमी पक्षाची पंजाबमध्ये सत्ता आल्यापासून त्यांना दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा मिळावा, यासाठी ते अधिक आग्रही झाले आहेत. केजरीवाल गेली नऊ वर्षे दिल्लीच्या जनतेला मूर्ख बनविण्याचे काम करीत आहेत, पण दिल्ली सेवा कायद्यात सुधारणा झाल्याने यापुढे त्यांना मनमानी कारभार करता येणार नाही. मुख्यमंत्री निवासस्थानाची रंगरंगोटी आणि नवीन फर्निचर यावर त्यांनी लाखो रुपये उधळले आहेत.

घोटाळे व भ्रष्टाचार त्यांच्या सरकारमध्ये बोकाळला आहे. दोन मंत्री जेलमध्ये आहेत, केंद्रीय चौकशी यंत्रणांच्या रडारवर आम आदमी पक्षाचे अनेक नेते आहेत. दिल्लीचा कारभार बघायला अनेक यंत्रणा असताना पुन्हा विधानसभा कशासाठी, अशा चर्चेला उधाण आले आहे. दिल्लीवर केजरीवाल यांचे वर्चस्व असता कामा नये, यासाठी केंद्र सरकार डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवून आहे. दिल्लीकरांना आता सेवा-सुविधा पुरवायच्या आहेत, त्याच्या चाव्या केंद्र सरकारच्या हाती राहतील, अशी दिल्ली सेवा विधेयकात सुधारणा करण्यात आली आहे. नव्या कायद्यामुळे दिल्लीचे नायब राज्यपाल हेच दिल्लीचे सुपर बॉस झाले आहेत.


दिल्ली या केंद्रशासित प्रदेशातील अधिकाऱ्यांच्या नेमणुका व बदल्या यांचे अधिकार नायब राज्यपालांना असतील, असा एक वटहुकूम केंद्र सरकारने अगोदर काढला होता. त्याविरोधात दिल्ली सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली व न्यायालयानेही दिल्ली सरकारचे म्हणणे मान्य केले. त्यानंतर लगेचच संसदेच्या पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकारने दिल्ली सेवा सुधारणा विधेयक आणून दिल्ली सरकारचे दातच काढून घेतले. बिजू जनता दल, वायएसआर काँग्रेस आणि तेलुगू देशम या पक्षांनी केंद्राच्या बाजूने मतदान केले त्यामुळे विरोधकात फूट पडल्याचे स्पष्ट झाले. मदनलाल खुराणा, साहिब सिंग वर्मा, सुषमा स्वराज किंवा शीला दीक्षित हे मुख्यमंत्री असताना केंद्र विरुद्ध दिल्ली सरकार असा संघर्ष कधी झाला नव्हता. पण, केजरीवाल मुख्यमंत्री झाल्यापासून केंद्राशी सतत कोणत्या ना कोणत्या मुद्द्यांवरून संघर्ष चालू आहे. नायब राज्यपाल व मुख्यमंत्री यांच्यातही सतत खणखणाट ऐकायला मिळत आहे. नव्या कायद्यामुळे केजरीवाल यांच्या मनमानीला लगाम बसेल, अशी अपेक्षा आहे.

**- डॉ. सुकृत खांडेकर.**

## टुडेज् ब्लॉग

# रस्ते अडवा, पैसे मिळवा

महाराष्ट्र राज्याच्या ग्रामविकास विभागातील तब्बल १९ अधिकारी ग्रामीण भागातील रस्त्यांचे काम पाहण्यासाठी ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड दौऱ्यावर जाणार आहेत. १३ ते २७ ऑगस्ट दरम्यान ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव, सचिव, वित्तीय नियंत्रकासह ग्रामविकास खात्यांतर्गत राज्यातील विविध विभागात काम करणारे अधिकारी या अभ्यास दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात प्रत्यक्ष फिल्डवर काम करणारे अभियंते आहेत की केवळ अधिकारी? हा प्रश्न देखील महत्वाचा आहे. आशियाई विकास बँकेच्या अर्थसहाय्याने राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना राबवण्यात येते. सदर बँक आणि त्यांनी नेमलेल्या सल्लागार कंपनीच्या खर्चातून सदरील अभ्यास दौरा आयोजित केलेला आहे. 'अभ्यास दौरा' असल्याने त्याचे स्वागतच आहे. पण तरीही काही प्रश्न उरतात आणि त्याचा उहापोह केलाच जायला हवा. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड या देशातील ग्रामीण रस्त्यांचा अभ्यास केल्याने आपल्या राज्यातील रस्ते खरच सुधारणार आहेत का? वैद्यक शास्त्राच्या सर्वसामान्य नियमांनुसार ज्या पेशंटला आजार आहे त्याचे निदान करण्यासाठी त्या पेशंटचाच अभ्यास करणे ही सर्वात महत्वाची गोष्ट असते, मांडावयाचा मुद्दा हा आहे की, ग्रामविकास खात्याने पाश्चात्य देशात जाण्यापूर्वी आपल्या देशातील आणि राज्यातील ग्रामीण असो की शहरी रस्त्यांच्या निकृष्ट दर्जाच्या कारणांचा अभ्यास केलेला आहे का? तो अभ्यास केल्यानंतर जी जी कारणे त्यांना आढळली त्या त्या कारणांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न केले का? अर्थातच याचे उत्तर नकारात्मकच असणार आहे हे नक्की! जो आजार शरीराच्या आतल्या भागात आहे त्याचा अभ्यास करण्यासाठी एन्डोस्कोपी, अँजिओग्राफी अशा तंत्रांची मदत घ्यावी लागते. पण जो आजार शरीराच्या बाह्य भागावर झालेला आहे आणि तो उघड्या डोळ्याने पाहिल्यावर अगदी स्पष्ट दिसतो. त्यासाठी अधिक तपासण्या करण्याची आवश्यकताच असत नाही. हाच नियम ग्रामीण भागातील रस्त्यांच्या अभ्यासासाठी लागू पडतो.




ग्रामीण भागातील रस्त्यांना चावडीवर गप्पा मारणारी मंडळी 'काळी शेती' असे संबोधतात. काळी शेती म्हणजे डांबरी रस्त्याच्या कामातून मिळवले जाणारे कमिशन, नफा, उत्पन्न इ. रस्त्यांची कंत्राटे म्हणजे 'सरकारी पैशाने' सत्तेवर असणाऱ्या पंचायत समिती सदस्य ते आमदार-खासदारांचे आप्तस्वकीय, जवळचे कार्यकर्ते यांना सांभाळण्यासाठीचा 'सरकारमान्य राजमार्ग' अशी कार्यपद्धती आहे हे जगजाहीर आहे. रस्त्याचे कंत्राट देण्यापासून ते रस्त्यांचे बिल काढेपर्यंत प्रत्येक ठिकाणी 'दक्षिणा' ठरलेली असते आणि त्यामुळे रस्त्याचे कंत्राट घेणाऱ्या कंत्राटदाराला एकूण कंत्राटाच्या ३० ते ४० टक्के रक्कम ही कमिशन म्हणून रस्त्याशी निगडित असणाऱ्या सर्वच घटकांना द्यावी लागते हे कटू वास्तव आहे. त्यासाठी कुठला अभ्यास करण्याची गरजच असत नाही. 'रस्ता आडवा, पैसे मिळवा' अशा पद्धतीने विविध राजकीय संघटना, आरटीआय कार्यकर्ते रस्ते निर्मितीकडे पाहतात. याचा अभ्यास अधिकाऱ्यांना आहे की नाही?

**- सुधीर दाणी.**

## जन्म हा अखेरचा

# शिष्यस्थल -२



गुरुंचा आदेश पाळला तरच सूक्ष्मदेहाचा आजार दूर होईल. मन अन्नाचा परिणाम आहे. म्हणून मन शुद्ध करण्यासाठी शुद्ध आहार घ्यावा लागतो. शुद्ध आहारासाठी अर्थार्जन शुद्ध असावे लागते. व्यापार करताना ग्राहकांची फसवणूक करून कमाई केली तर ती शुद्ध कशी असेल? त्या पैशांनी घेतलेले अन्न शुद्ध असणार नाही आणि अन्न शुद्ध नाही म्हणून मनदेखील शुद्ध होणार नाही. यावर एक उपाय आहे. अन्न प्रथम भगवंताला अर्पण केले तर ते शुद्ध होते. शिवार्पित अन्नाचे प्रसाद म्हणून सेवन केले तर मनात प्रसन्नता भरुन राहते. भगवंत तुमचे अन्न खात नसतो आणि आपणदेखील त्याने खावे म्हणून देत नसतो. देवाला नैवेद्य फक्त 'दाखवत' असतो, खाऊ घालत नसतो. त्याला दाखवून म्हणजे अर्पण करुन आपण तो प्रसाद म्हणून घ्यायचा असतो. देवाला अन्न दाखवल्याने अन्नातील दोष नाहीसे होतात आणि अन्न शुद्ध होते. प्रसादान्न सेवन केल्याने मन प्रसन्न राहते.

अलिकडे अन्नसेवनाची पद्धती पार बदलून गेली आहे. हातात प्लेट घेऊन उभे राहून माणसे भोजन करतात. सगळ्यात गंमतीची गोष्ट अशी की, 'हे करु नको' असे सांगितले तर मनुष्य ते नक्कीच करतो. 'कोणत्याही वस्तूला हात लावू नये' अशी पाटी पाहिली तर तो त्या वस्तूला मुद्दाम हात लावून बघणार. सिगारेट ओढणे स्वास्थ्याला हानिकारक आहे, असे पाकिटावर छापलेले असते. तरीदेखील ज्यांना वाचता येते, अशी शिक्षित माणसे सिगारेट ओढतात. खाण्यापिण्यात जोपर्यंत सात्त्विकता येत नाही, तोपर्यंत आपले मन सात्त्विक होत नाही. ज्याला शिष्य व्हायचे आहे, त्याने 'शान्त' आणि 'दान्त' झाले पाहिजे. गुरुदीक्षा घेतल्यानंतर तुमच्या वर्तनात सात्त्विकता आली पाहिजे. शिष्य तपस्वी असावा. तप म्हणजे सहनशीलता. एखादा योगी दहा दहा वर्षे एकाच जागी बसून राहतो असे आपण ऐकत असतो. त्याच्या ठिकाणी सहन करण्याची ताकद असते.

**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# भारत जोडो भाग दोनचे यशापयश

भारत जोडो यात्रेच्या यशानंतर कर्नाटकात कौल मिळाला, त्याचप्रकारचा कौल आगामी लोकसभा निवडणुकीत मिळू शकेल अशा भावनांनी भारत जोडो २ ची घोषणा झाली आहे. पहिल्या यात्रेत बारा राज्यांचा प्रवास करीत जाती - जातीत, धर्मा-धर्मांत विभागला जाणारा देश एकसंघ व्हावा अशा भावना मांडण्याच्या प्रभावाने काँग्रेसला कर्नाटकात सत्ता हाती लागली. पुढे सर्व वीसएक विरोधी पक्षांच्या नेत्यांनी एकत्र येऊन इंडिया आघाडी केली. राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवरील पक्षांचे प्रमुख यांनी एकत्र येऊन नवी आघाडी उभारली खरी पण त्यामागे चर्चेत असणाऱ्या पक्षांच्या प्रमुखांना आघाडीत वेगळे स्थान मिळविण्याच्या किंवा सत्तास्थाने आपल्या मतांप्रमाणे ठरविली जावीत ह्या अघोषित मागण्या आहेत. पंतप्रधानपदासाठी तर अनेक दावेदार आहेत. त्यावरून ही आघाडी निवडणुकांपर्यंत किती टिकून राहील याचा अंदाज वर्तविणे कठीण होत आहे. एकाच मतदारसंघावर अनेकांचे दावे, उमेदवार निवडताना जात पात, धर्म यांसारख्या अटी यांवर एकमत झाले तरीही प्रचारसभांमधून, मतदारांवर प्रभाव पाडण्यातही आघाडीचे नेते यशस्वी होणे आवश्यक आहे.

कर्नाटक अनुभवानंतर भारत जोडो २ ही पदयात्रा, एखादा चित्रपट यशस्वी झाल्यावर त्याच नावाने भाग एक, भाग दोन जसे निर्माण केले जातात त्याच धर्तीवर दुसरा भाग आणण्याचे ठरवून आगामी निवडणुकांत त्यांचा उपयोग करून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे असे भासते. तिचे उद्देश सफल होण्याकरिता बदलत्या वातावरणाचा अंदाज घेऊन त्यानुसार आखणी करणे गरजेचे असते. पुढील प्रत्येक कृतीदरम्यान लोकांना काहीतरी नवे, विश्वासदर्शक ध्येय समोर ठेवावे लागते. निव्वळ एका कृतीच्या अनुकरणाने सिद्धी प्राप्त होत नसते. विरोधक जनसेवेपेक्षा व्यक्तिगत स्वार्थापायी जवळ आले आहेत असे जनतेच्या मनात ठासले गेले की पदयात्रा, रथयात्रा प्रभावी ठरणार नाहीत. यापूर्वी फक्त सत्तेत येण्यासाठी म्हणून केलेल्या आघाड्यांनी देशाचे, राजकारणाचे आणि अर्थव्यवस्थेचे स्वरूप काय करून ठेवले होते याचा देशातील मतदारांना चांगलाच अनुभव आहे. ते लक्षात घेऊन जनता निर्णय घेणार आहे. जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी इंडियाच्या एकीवर सर्वानुमते जाहीर शिक्कामोर्तब केले जाणे आवश्यक आहे. तसे झाल्यास पदयात्रेला सूर सापडू शकेल. अन्यथा सद्य परिस्थितीची पुढील आवृत्ती पहावयास लागणार आहे हे इंडियाकारांनी लक्षात घेण्याची गरज आहे. या सर्वांवरच 'भारत जोडो' चे यश अवलंबून राहील. **- स्नेहा राज, गोरेगांव.**

# दूरदृष्टी लाभलेला सामाजिक कार्यकर्ता

बिंदेश्वर पाठक यांच्या निधनामुळे देश एका महान सामाजिक कार्यकर्त्याला मुकला आहे. प्रचलित काळात सामाजिक कार्यकर्ते नानाविध नागरी समस्यांना हात घालताना दिसतात. आधुनिक राहणीमानाशी संबंधित पाणी, रस्ता, आरोग्य आदी विषयांसाठी पाठपुरावा करतात. मात्र, शौचालयांच्या समस्येचा साकल्याने विचार करणारे, त्यासाठी अवघी हयात पणाला लावणारे विरळाच. त्यादृष्टीने विचार करता बिंदेश्वरजींचे कार्य अजोड ठरते. आजघडीला देशभर शहरांचे नेटके नियोजन करण्यावर भर दिला जात आहे. शहरांचा विकास ही चांगली बाब आहे; पण खेड्यांकडे लक्ष देणेही तितकेच आवश्यक आहे आणि तीही स्वच्छ केली पाहिजेत. मात्र, शौचालयांच्या कमतरतेच्या प्रश्नाला अनेक कंगोरे आहेत. त्या दृष्टीने विचार होणे आवश्यक आहे. म्हणूनच पाठक यांच्या निधनाने जणू आधुनिक काळात स्वच्छतेचे महत्त्व ओळखणारा धुरंदर सामाजिक कार्यकर्ता हरपला आहे.

आज देशात वेगवेगळी स्वच्छता अभियाने सुरू असताना, भंगीमुक्तीची घोषणा केली जात असताना स्वच्छतागृहांच्या शोषखड्ड्यात पडून अनेकांचे बळी जात आहेत. अशा वेळी बिंदेश्वर पाठक यांच्या पाच दशकांपूर्वीच्या भंगीमुक्तीच्या अभियानाचे महत्त्व लक्षात येते. त्यांनी 'सुलभ इंटरनॅशनल'ची स्थापना केली. १९७०च्या दशकात 'सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिसेस'चा पाया घातला. याद्वारे त्यांनी देशभरातील बस स्थानके, रेल्वे स्थानके आणि इतर सार्वजनिक ठिकाणी शौचालये बांधली. सुलभ शौचालयाच्या नावाने आज या शौचालयांचे जाळे संपूर्ण देशात आहे. त्यांनी समाजाच्या प्रगतीसाठी आणि उपेक्षित लोकांच्या सक्षमीकरणासाठी खूप काम केले. स्वच्छ भारत घडवणे हे त्यांचे ध्येय होते.



महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यानंतर बिंदेश्वर पाठक यांनी काही दिवस शिक्षक म्हणून काम केले. त्यानंतर ते बिहार गांधी शताब्दी उत्सव समितीमध्ये कार्यकर्ता म्हणून सामील झाले. येथे त्यांनी 'भंगीमुक्ती सेल'मध्ये काम करण्यास सुरुवात केली. येथेच त्यांनी हाताने शौचालये साफ करणाऱ्या कामगारांच्या समस्या जाणून घेतल्या. यानंतर त्यांनी १९७० मध्ये 'सुलभ इंटरनॅशनल'ची स्थापना केली. या अंतर्गत कमी खर्चात सार्वजनिक शौचालये बांधण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. त्यांनी उघड्यावर शौचास जाण्याची प्रथा थांबवून अस्वच्छ सार्वजनिक शौचालयांच्या जागी स्वच्छ शौचालयांचे स्वप्न पाहिले आणि प्रत्यक्षातही आणले. देशभरातील सार्वजनिक ठिकाणी सुलभ शौचालये बनवण्याचे श्रेय त्यांच्या संस्थेला जाते. ही कमी किंमतीची स्वच्छतागृहे 'इको-फ्रेंडली' मानली जातात. 'सुलभ' मॉडेलवर बांधलेली शौचालये ही सार्वजनिक शौचालये बांधण्याच्या क्षेत्रात क्रांती मानली जाते. त्यांची संस्था मानवी हक्क, पर्यावरण, स्वच्छता, अपारंपरिक ऊर्जा स्रोतांचा विकास आणि व्यवस्थापन तसेच कचरा व्यवस्थापनासह सामाजिक सुधारणांना चालना देण्यासाठी कार्य करते. त्यांनी १९६८ मध्ये प्रथम 'डिस्पोजल कंपोस्ट टॉयलेट'चा शोध लावला.

घराच्या आजूबाजूला मिळणाऱ्या साहित्यापासून ते कमी खर्चात बनवता येते. हे जगातील सर्वोत्तम तंत्रांपैकी एक मानले गेले. पुढे 'सुलभ इंटरनॅशनल'च्या मदतीने त्यांनी देशभर सुलभ टॉयलेटची साखळी उभी केली. अनेक दशकांपासून सार्वजनिक सुविधांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या या संस्थेने यापूर्वी काबूलमध्ये शौचालये उपलब्ध करून दिली होती. अमेरिकेच्या लष्कराने त्यांना त्यासाठी विनंती केली होती. अमेरिकन लष्कराने 'बायो गॅस'च्या विशेष पद्धतीने चालवल्या जाणाऱ्या टॉयलेटची मागणी केली होती. अशी प्रभावी आणि स्वस्त शौचालये काबूलमध्ये सर्वत्र बसवावीत, अशी लष्कराची इच्छा होती. 'सुलभ इंटरनॅशनल'ने भारताव्यतिरिक्त दक्षिण आफ्रिका, चीन, भूतान, नेपाळ आणि इथिओपियासह इतर दहा देशांना शौचालयाशी संबंधित तंत्रज्ञान दिले होते.

डॉ. पाठक यांच्या घरात कधी शौचालय नव्हते. त्यांच्या घरातील स्त्री-पुरुषही शौचासाठी घराबाहेर शेतात जात असत. त्यामुळे त्यांच्या घरातील सदस्य वारंवार आजारी पडत असत. बालपणीच्या या घटनांचा त्यांच्या जीवनावर खोलवर परिणाम झाला. लहानपणी त्यांनी विचार केला होता की, मोठे झाल्यावर आपल्या घरातच नव्हे तर संपूर्ण देशात शौचालये बांधायची आहेत; जेणेकरून इतर घरातील लहान मुले, महिला आणि वृद्धांना शौचासाठी घराबाहेर पडावे लागणार नाही. बालपणी त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. त्यांच्या घरात नऊ खोल्या होत्या; पण एकही शौचालय नव्हते. त्यांचे सुरुवातीचे शिक्षण गावातच झाले. त्यानंतर ते पुढील शिक्षणासाठी बनारसला गेले. बनारस हिंदू विद्यापीठातून त्यांनी समाजशास्त्रात पदवी संपादन केली. पुढे त्यांनी पाटणा विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण आणि पीएच.डी. पदवी पूर्ण केली. १९७० मध्ये त्यांनी 'सुलभ इंटरनॅशनल' सुरू केले. त्यांच्या 'सुलभ इंटरनॅशनल'ने नेहमीच उपेक्षितांसाठी काम केले. त्यांच्या निधनामुळे स्वच्छतेच्या क्षेत्रात अत्यंत रचनात्मक काम करणारा एक मोठा सामाजिक कार्यकर्ता आपल्यातून निघून गेला आहे.

**- जनार्दन पाटील.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# पाणीपुरवठा विस्कळीत; नागरिक झाले हैराण

सुराज्य/सोलापूर

**वर्षभराची पाणीपट्टी भरणाऱ्या सोलापूरकरांना वर्षातून किमान तीन महिने देखील पाणीपुरवठा करण्यात महापालिका प्रशासन अपयशी ठरते आहे. उन्हाळा सुरु झाल्यानंतर पालिका प्रशासनाने तीन दिवसाआड सुरु असलेला पाणीपुरवठा चार दिवसाआड केला. इतकेच काय तर चार दिवसाआडच्या पाणीपुरवठ्यातही १५ टक्के पाणीकपात केली. गेल्या काही दिवसात अचानकपणे चार दिवसाआड देखील पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिक हैराण झाले आहेत. हद्दवाढच्या काही भागात गुरूवारी पाणीपुरवठा झाला नाही. त्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे.**

## महापालिकेच्या काराभाराबाबत व्यक्त होतोय संताप



### महापालिकेकडून सूचनाही नाही

विशेष म्हणजे महापालिकेकडून पाणीपुरवठा उशीराने होणार अशी सूचनाही मिळत नसल्याच्या तक्रारीही नागरिकांमधून होत आहेत. हद्दवाढ भागातील विमानतळ, शिवशाही मजरेवाडी, भारत माता नगर, हरळ्या नगरात गुरुवारी पाणीपुरवठा झाला नाही.

कडक उन्हाळ्यात तीन ऐवजी चार दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात आल्यानंतर पाऊस सुरु झाल्यानंतर तरी पुन्हा तीन दिवसाआड पाणीपुरवठा होईल, अशी अपेक्षा होती. मात्र ऐन पावसाळ्यातही पाण्याची बोंबाबोंब सुरु झाली आहे. अनेक भागात चार ऐवजी पाच तर कुठे सहा दिवसांआड



पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. महापालिकेवर गेल्या दिड वर्षांपासून प्रशासकराज असल्याने त्यांच्यावर कोणाचाही अंकुश राहिला नाही, अशी प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहेत.

सोलापूरसाठी वरदायिनी ठरलेले उजनी धरण मायनसमधून प्लसमध्ये आले असले तरी पाणीसाठा अवघ्या १३ टक्क्यांवरच अडकलेला आहे. पावसाळा संपेपर्यंत जर का पुणे जिल्हा आणि उजनी धरण लाभक्षेत्रात जर का पाऊस न पडल्यास मात्र सोलापूरकरांवर मोठे जलसंकट ओढावण्याची शक्यता आहे. शहरासाठी वर्षभरात किमान चार ते पाच आवर्तने पाणी धरणातून सोडले जाते. महापालिका यासाठी पैसे मोजते. अर्धा पावसाळा संपला तरी धरणातील पाणीसाठा खूपच कमी असून पावसाने जर का आगामी काळात ओढ दिली तर मात्र सोलापूरकरांना आगामी उन्हाळ्यात मोठ्या पाणीटंचाईला तोंड द्यावे लागण्याची शक्यता आहे. याबाबत शासन-प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने लक्ष घालण्याची गरज आहे.



## बाळे येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध उपक्रम

**सोलापूर** : भारताच्या ७६ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त सालाबादप्रमाणे अंबिका नगर जि. प. शाळा, डीव्ही ढेपे इंग्लिश मीडियम स्कूल, एन के स्कूल या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी राजू आलूरे, आनंद भवंर, विनय ढेपे, अमोल झाडगे, शिरीष सुरवसे, रतन क्षीरसागर, अण्णाराव रणशूर, दिलीप शिंदे, शंभू देव गावडे सर, गणेश मामा सरवळे, सुहास माने, आतिश व्होनमाने, यतीराज पांढरे, बळीराम गावडे आदी उपस्थित होते. यावेळी रक्तदान शिबिरही घेण्यात आले. कार्यक्रमाचे आभार आनंद भवर यांनी मानले.



## आनंदराव देवकते प्रशालेत स्वातंत्र्य दिन साजरा

**सोलापूर** : वडजी (ता.द.सोलापूर) येथील आनंदराव देवकते माध्य.व उच्च माध्य.प्रशाला येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रास्ताविक प्रशालेचे मुख्याध्यापक कल्याण गजबार यांनी केले. मा.सरपंच विठ्ठल हक्के व मा.सरपंच रामहरी हवालदार यांच्या हस्ते प्रतिमापूजन व ध्वजारोहण केले. यावेळी देशभक्तीपर गीते, भाषणे व पथनाट्य सादर करण्यात आले. अध्यक्षस्थानी बंडू चेंडके यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मधुकर चिवरे, अशोक पाटील,दादा हक्के, आबा भागवत,गोकुळ हवलदार, गोविंद चौगुले,सिताराम कदम,राजू पवार,किशोर गाडेकर, नवनाथ मळगे,सुभाष सुतार, सत्यवान दुधाळ, हणमंत सरडे, गोपाळ कुंभार,दयानंद कांबळे,विठ्ठल चिवरे,जालिंदर गायकवाड, अक्षय मस्के उपस्थित होते.गुडलक हेअर स्टाईल, अहिल्या प्रतिष्ठान, हवलदार दूध डेरी यांच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. कार्यक्रमास शाळा विभाग प्रमुख श्रीमंत हक्के,सांस्कृतिक प्रमुख आनंद भिमन्नवरु,अविनाश राठोड,सचिन क्षिरसागर तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन संध्याराणी चिवरे व अश्विनी निचळ यांनी केले व उपस्थितांचे आभार सुरेंद्र कांबळे यांनी मानले.

## जोशी गल्ली येथे दगड, काठी आणि धारदार वस्तूने मारहाण; दोन महिलांसह चौघे जखमी

**सोलापूर** : घराजवळ घाण टाकल्याच्या कारणावरून दोन गटात दगड काठी आणि धारदार वस्तुने झालेल्या मारहाणीत २ महिला सह चौघेजण जखमी झाले . ही घटना रविवार पेठेतील जोशी गल्ली येथे गुरुवारी सकाळच्या सुमारास घडली.सर्व जखमींना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले .

अर्चना सिद्धेश्वर सरवदे (वय ३१ ) आणि पल्लवी अंकुश सरवदे (दोघी रा. रविवार पेठ ) अशी पहिल्या गटातील जखमींची नावे आहेत. त्यांना गणेश विष्णू सरवदे, विष्णू सरवदे आदींनी मी दगड आणि काठीने मारहाण केली. तर दुसऱ्या गटातील गणेश विष्णू सरवदे (वय २४) आणि त्याचा भाऊ नितीन सरवदे (वय २३ रा . जोशी गल्ली) अशी जखमीची नावे आहेत .त्यांना त्याच कारणावरून अंकुश ज्ञानेश्वर सरव दे आणि अन्य दोघांनी धारदार वस्तू आणि काठीने मारहाण केली. या घटनेची नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली आहे.

## शहरातील रेशनदुकानदारांची मनमानी वाढली; ग्राहकांशी अरेरावी

### लोकप्रतिनिधींच्या तक्रारी : एफडीओ सुमित शिंदेचा कारवाईचा इशारा

सुराज्य/सोलापूर

सार्वजनिक वितरण प्रणालीच्या माध्यमातून गोर गरिबांना दिल्या जाणाऱ्या रेशन दुकानदारांच्या तक्रारी वाढल्या आहे. धान्य वाटपावरून ग्राहकांना सौजन्याची वगणूक देण्यापेक्षा त्यांना अरेरावीची भाषा करत मुजोरी वाढली आहे. अशा अनेक तक्रारी लोकप्रतिनिधींनी अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे यांच्याकडे वाढल्या आहेत. अशा दुकानदारांच्या विरोधात कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. दोन दिवसात शहरातील सर्व रेशन दुकानदारांची बैठक घेऊन जाब विचारणार आहेत.

शहरातील रेशन दुकानदारांच्या विरोधात लोकप्रतिनिधींच्या तक्रारी वाढल्या आहेत. कमी धान्य देणे, मोफत धान्य वाटपाचे आदेश असताना मोफत योजना बंद झाली आहे. असे सांगत धान्य देण्यास टाळाटाळ करणे, ग्राहकांची आरेरावीची भाषा वापरणे अशा तक्रारी शहर उत्तरचे आमदार

काही दुकानदारांच्या तक्रारी आमदार आणि माजी नगरसेवकांनी केल्या आहेत. याबाबतची माहिती वितरण विभागाकडून मिळाली आहे. लवकरच संघटनेच्या माध्यमातून दुकानदारांची बैठक घेऊन योग्य त्या सुचना केल्या जाणार आहे. जे दुकानदार ग्राहकांना वाईट वागणूक देतात त्यांच्यावर अन्नधान्य वितरण विभागाकडून कारवाई झाल्यास संघटना अशा दुकानदारांना पाठिशी घालणार नाही – **नितीन पेंटर** (जिल्हा संपर्क प्रमुख रेशन दुकानदार संघटना)



विजय देशमुख यांच्यासह काही माजी नगरसेवकांनी अन्नधान्य अधिकारी यांच्याकडे केल्या आहेत. काही माजी नगरसेवकांनी रेशनदुकानदारांनी ग्राहकांना दिलेल्या वागणूकीचे व्हिडीओ आणि ऑडीओ देखिल सादर करत दुकानदारांच्या वाढलेल्या तक्रारींचा पाढा वाचला या तक्रारींची दखल घेऊन शुक्रवारी चार परिमंडल अधिकाऱ्यांची अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांनी बैठक घेतली आणि ज्या दुकानदारांच्या विरोधात तक्रारी आहेत. त्यांच्या विरोधात कारवाईचा बडगा उगारत कारवाई करण्याचे आदेश दिले असल्याचे समजते. तसेच २४ ऑक्टोबर रोजी झोन निहाय बैठका घेऊन दुकानदारांच्या तक्रारी आणि सुचना देण्याचे आदेश अन्नधान्य अधिकारी सुमित शिंदे यांनी दिले आहे.

या संदर्भात रेशन दुकानदार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना विचारणा केली असता या प्रकाराला संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दुजोरा दिला आहे. काही दुकानदार आहेत. त्यांच्या तक्रारी आहेत. अशा दुकानदारांना संघटना पाठीशी घालत नाही मात्र काही दुकानदारांमुळे संघटनेची बदनामी होत आहे. जे दुकानदार ग्राहकांची फसवणुक करतात अशा दुकानदारांना पाठीशी घालणार नाही संघटनेच्या माध्यमातून नियमित ग्राहकांना चांगली सेवा द्या, आरेरावीची भाषा करू नका, धान्याचे व्यवस्थित वाटप करावे अशा सुचना देत असल्याचे सांगितले.

## कुरुल येथे चैन आणि केबलने मारहाण; महिलेसह दोघे जखमी

सुराज्य/सोलापूर

पूर्वीच्या भांडणावरून लोखंडी चेन, केबल आणि काठीने केलेल्या मारहाणीत महिलेसह दोघेजण जखमी झाले. ही घटना कुरूल (ता.मोहोळ) येथे बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली .

सुवर्णा धोंडीबा वाघमोडे (वय ४५ ) आणि अंकुश धोंडीबा वाघमोडे (वय २८ दोघे रा. कुरूल) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना कामती येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

काल रात्री नऊ वाजेच्या सुमारास त्यांना गणेश भाऊसाहेब जाधव त्याचा भाऊ महेश आणि इतर चौघांनी मिळून मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.




## रॉबिनहूड आर्मीतर्फे १७ गावांतील गरजू कुटुंबाना १५८ किटचे वाटप

सुराज्य/सोलापूर

रॉबिनहूड आर्मी सोलापूरतर्फे १७ गावांतील गरजू कुटुंबाना १५८ किटचे वाटप करण्यात आले. अन्नदान उपक्रमाचे हे सलग सातवे वर्ष होते.स्वातंत्र्य दिनानिमित्त रॉबिन हूड आर्मी सोलापूरतर्फे ९ दिवसांच्या 'मिशन स्वदेश' चे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाची सांगता दक्षिण सोलापूर तालुक्यातील दर्गनहळ्ळी या गावामध्ये झाली.

या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून सोलापुरातील नामवंत उद्योजक सामाजिक कार्यकर्ते जयेश पटेल उपस्थित होते. तर लायन्स क्लब ऑफ सोलापूर मिडटाउनच्या अध्यक्षा श्वेता बंडेवार, डॉ. श्रीपाद कुलकर्णी, बसवराज बिराजदार, शशिकला पाटील, सचिन गोगाव, केदार दोड्डाळे, अमोल गुंड यांची प्रमुख उपस्थिती होती. रॉबिन हूड आर्मी, सोलापूरच्यावतीने सलग सातव्या वर्षी अन्नदान कार्यक्रमाच्या माध्यमातून १७ गावातील गरजू कुटुंबाना एकूण १५८ किटचे केले वाटप.

सोलापुरातील हॉटेल, मंगल कार्यालय व कार्यक्रमातून शिल्लक राहिलेले अथवा ताजे अन्न गरजूंपर्यंत पोहोच करणाऱ्या रॉबीन हुड आर्मी सोलापूरच्यावतीने दररोज अन्नदान उपक्रम राबविला जातो. आतापर्यंत तब्बल सहा लाखपेक्षा जास्त गरजूंना अन्नदान करण्यात आले आहे. तसेच असून विविध समाजपयोगी उपक्रम राबविले जातात. दरवर्षी प्रमाणे यंदाही स्वातंत्र्य दिनानिमित्त ७ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधी मध्ये एकूण १७ गावांमधल्या १५८ एकल महिला, निराधार, अपंग व गरजू कुटुंबाना घरपोच धान्याचे किट पोहोचविण्यात आले. या उपक्रमाचा सांगता समारंभ दक्षिण सोलापूर तालुक्यातील दर्गनहळ्ळी या गावामध्ये उत्साहात पार पडला. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी अनिकेत चनशेट्टी, प्रियांका वडनाल, किशोर कलबुर्गी, व्यंकटेश गुंडू, राजश्री जोशी, प्रणय उबाळे, रोहन सावंत, सिद्धार्थ जगताप, विनीत कावळे, इरेश करजगी, भरत बरगोदीया, चित्रा कुलकर्णी, ओंकार अतनुरे, ओंकार हगलगुंडे, गोपाळ नाडीगोटू, आकाश मुस्तारे, समर्थ उबाळे, प्रेम भोगडे, ललित गुप्ता, अर्चना आघाव, डॉ. स्नेहल गोरे, सागर थोरात, पुजा थोरात, सुरज रघोजी, डोंगरेश चाबुकस्वार, लक्ष्मीकांत फलमारी, राहुल यळसंगी, सुजल यळसंगी, सिद्धिविनायक हिरजकर, विवेक नवले, अनिता कुंभार, केदार दोड्डाळे, अमोल गुंड, सचिन गोगाव, रवी चन्ना, अभिषेक चिक्कळी, हिंदुराव गोरे, शिल्पा शिवशरण, आकाश राठोड, नंदिनी दंडगुले, श्रावणी नवले, श्रुष्टी नवले, सुरज धनवे, संजीव म्हमाणे आदींनी परिश्रम घेतले.

## चोरी करून पळून जाताना नाकाबंदीत सापडला

सुराज्य/बार्शी

पिकप वाहनातत हॉटेल समोर ठेवलेले जनावरांचे खाद्य चोरून पळून गेले आणि कांही अंतरावर पोलिसांच्या नाकाबंदीत वाहनासह सापडले. त्यानंतर चोरीची घटना उघडकीस आली. ही घटना पाथरी (ता.बार्शी) येथे बुधवारी पहाटेच्या सुमारास घडली.

गणेश महेंद्र कानडे (वय २४ रा. बावी ता.वाशी जि. धाराशिव) असे रेड हॅन्ड सापडलेल्या चोरटयाचे नाव आहे . त्याचे दोन साथीदार मात्र पोलिसांच्या हातावर तुरी देण्यात यशस्वी ठरले.

बुधवारी पहाटे दोन वाजेच्या सुमारास गणेश कानडे यांच्यासह तिघेजण पाथरी येथील शंकर उत्तम गायकवाड यांच्या शेतातील हॉटेल समोर ठेवलेले सरकी आणि पेंडचे १२ गोणी एमएच२५-पी-४७५७ या पिकअप वाहनात भरत होते. त्यांच्या आवाजाने शंकर गायकवाड यांना जाग आली. ते बाहेर आले असता तिघेजण पिकअप घेऊन बार्शीच्या दिशेने पसार झाले.चोरीचा माल घेऊन जाणारी पिकअप कुसळंब येथे पोहोचली .पहाटे पाचच्या सुमारास नाकाबंदी करणाऱ्या पोलिसांनी पिकअप अडवून तपासणी केली. त्यावेळी दोघेजण पळून गेले. तर गणेश कानडे हा चोरटा पोलिसांच्या हाती लागला. पोलिसांच्या चौकशीत हा चोरीचा गुन्हा उघडकीस आला. दरम्यान शंकर गायकवाड यांनी बार्शी तालुका पोलिसात फिर्याद दाखल केली.

तिघांनी मिळून त्यांचा २१ हजाराचा माल पळविले. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. हवालदार बोबडे पुढील तपास करीत आहेत.




## सोलापूरचा धीरज न्युक्लिअरच्या उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला जाणार

### विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव

सुराज्य/सोलापूर

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिक्षणाचा मूलमंत्र उराशी बाळगून सुरते परिवाराने आपली वाटचाल केली आणि याच परिवारातील सुपुत्र धीरज सुरते हा अमेरिकेतील नामांकित अशा विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी जात आहे. ही निश्चितच सर्वांना अभिमानाची आणि गर्वाची गोष्ट आहे. आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर धीरज सुरते हा उज्वल यश संपादन करून जागतिक स्तरावर देशाचा नावलौकिक करेल, असा विश्वास विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केला.

सोलापूरचा सुपुत्र धीरज राज सुरते यांचा एम. एस. इन न्युक्लिअर या उच्च शिक्षणासाठी जागतिक स्तरावर २५ व्या क्रमांक वर असणाऱ्या मिशिगन अन अर्बन इन अमेरिका या विद्यापीठात प्रवेश निश्चित झाला आहे. उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला जात असलेल्या धीरज सुरते याचा सत्कार समारंभ उमा नगरी येथे आयोजित करण्यात आला होता.

यावेळी विचारमंचावर माजी राज्यमंत्री राजाभाऊ सरवदे, जेष्ठ नेते राहुल सरवदे, रवी गंगाधरे, ऍड. संजीव सदाफुले, माजी नगरसेवक रवी गायकवाड, युवा नेते देवा उघडे, नितीन गायकवाड, सीए धीरज जवळकर, मातोश्री जाईबाई सूरते, सतीश शेंडगे, उमेश सुरते, डॉ. शैलेंद्र सुरते, ड. कालिंदी सुरते, राज सुरते, योगिता सुरते आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे, मनीष केत, अविनाश गंजे, बाळासाहेब वाघमारे, अजित गायकवाड, ऍड.नितीन स्वामी,ऍड. अजय रणशृंगारे, किरण बनसोडे, पिंटू ढावरे, महेश निकंबे, अहाद शेख, अमर भालेराव, अमित कांबळे, रवी सरवदे, कांत उघडे, सुशील सरवदे, श्रीशैल रणधिरे, प्रमिला तूपलवंडे, मारुती कांबळे, सचिन वाघमारे, सागर बाबरे, शिवम सोनकांबळे, महेश भांडारकर, गणेश माने, सुकुमार बनसोडे, देविदास आबुटे, अश्विन बनसोडे, नागेश रणखांबे, विजय सोनवणे यांनी सत्कार केला. सूत्रसंचालन शिवम सोनकांबळे यांनी केले. कार्यक्रमासाठी यश सोनकांबळे, मयूर तळभंडारे, विपुल माने, तन्मय सुरते, संदीप सुरवसे, दया गायकवाड व समस्त सुरते मित्र परिवाराने परिश्रम घेतले.

## विविध विभागाचा आढावा घेऊन पुढील कामकाज करणार

### नूतन अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे यांची माहिती

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिकेतील विविध विभागांचा आढावा घेत आहे. त्या विभागातील अडचणी , उपलब्ध कर्मचारी वर्ग



### या विभागाचा आहे चार्ज

सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे यांच्याकडे महापालिका आयुक्तांनी विविध विभागांचा चार्ज देण्यात आला आहे. यामध्ये वाहन विभाग, निवडणूक कार्यालय ,आपत्ती व्यवस्थापन व अग्निशमन विभाग, विभागीय कार्यालय क्रमांक पाच व सहा, विद्युत विभाग ,नगरसचिव विभाग ,संगणक विभाग, अतिक्रमण विभाग, जनगणना कार्यालय, महिला व बालकल्याण विभाग, कामगार कल्याण व जनसंपर्क कार्यालय व दिव्यांग कल्याण या विभागाचा समावेश आहे.

आणि कामाचे नियोजन या संदर्भात आढावा घेत आहे. आपत्ती व्यवस्थापन ,अतिक्रमण विभाग याकडे प्राधान्याने लक्ष देणार असल्याची माहिती सोलापूर महापालिकेचे नूतन अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे यांनी गुरुवारी दिली.

सोलापूर महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे यांना कार्यमुक्त केल्यानंतर त्यांच्या रिक्त जागी अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे यांची नियुक्ती केली आहे. त्यांनी नुकताच पदभार घेतला आहे. दरम्यान, गुरुवारी महापालिका पत्रकार संघाच्या वतीने अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे यांचा अध्यक्ष किरण बनसोडे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

विविध विभागातील कॉम्प्युटर, कर्मचाऱ्यांची कमतरता आहे, तीही भरून काढण्यात येईल. सोलापूर शहरातील अतिक्रमण विभागाचे योग्य नियोजन करून कार्यवाही करण्यात येईल. महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली - उगले यांच्या मार्गदर्शनाखाली कामकाज करणार आहे, असेही मोरे यांनी सांगितले. यावेळी पत्रकार उपस्थित होते.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM SECOND TIME EXTENSION NOTICE**

Digitally signed online bids are invited through RE-Tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000027957 RE-Tender No.** SE/EHV/O&M/Circle/SHP/RE-Tender:11/2023-2024 **Particulars:** Work of rate contract for supply of required spares, repairing & testing of healthiness of NIFPS along with demonstration at various EHV Substations under EHV O&M Circle, Solapur. **Estimated Cost:** Rs. 20,00,000/- **EMD: (Approx. 1% of Est. Cost):** Rs. 20,000/- **Tender Cost:** Rs. 500/- + GST **Sale Period:** 17.08.2023 to 24.08.2023 **Last Date of Submission:** 24.08.2023 up to 23:59 Hrs. **Date of Opening (Tech. Bid):** 25.08.2023 at 12:00 Hrs (If possible). **Contact Person:** Superintending Engineer - 7447440608. For further details, please visit to **https://srmetender.mahatransco.in**.

**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV O&M Circle, Solapur**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM TIME EXTENSION NOTICE**

Digitally signed online bids are invited through E-Tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered contractors of MSETCL. **RFx No. 7000028101 E-Tender No.** SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender:13/2023-2024 **Particulars:** Work of Annual Rate Contract for Chemical Washing of Insulator Strings of various 220/132/110 kV Lines (as and when required) under EHV O&M Circle, Solapur. **Estimated Cost:** Rs. 77,71,926/- **EMD (Approx. 1% of Est. Cost):** Rs. 77,719/- **Tender Cost:** Rs. 500/- + GST **Sale Period:** 17.08.2023 to 24.08.2023 **Last Date of Submission:** 24.08.2023 up to 23:59 Hrs **Date of Opening (Tech. Bid):** 25.08.2023 at 12:00 Hrs (If possible). **Contact Person:** Superintending Engineer - 7447440608. For further details, please visit to **https://srmetender.mahatransco.in**

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV O&M Circle, Solapur**



## शिवशाहीर विशाल इंदलकर व गोल्ड मेडल शिवतेज जगताप यांचा सन्मान

**टेंभुर्णी** : पंढरपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवून गोल्ड मेडल प्राप्त करून त्याची दिल्ली येथे होणाऱ्या कराटे स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल शिवतेज जगताप व मराठा सेवा संघ प्रणित संभाजी ब्रिगेड च्या सोलापूर जिल्हा प्रवक्तेपदी शिवशाहीर विशाल ऊर्फ अण्णासाहेब इंदलकर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान सरपंच नवनाथ शिंदे व चव्हाणवाडी ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित चव्हाणवाडीचे सरपंच नवनाथ शिंदे, सरपंच हनुमंत चव्हाण, ॲड सचिन चव्हाण, टिंकल स्टार या शाळेचे संस्थापक हरिश्चंद्र गाडेकर, शिवसेनेचे माढा तालुका उपाध्यक्ष रोहन चव्हाण, पत्रकार धनंजय भोसले, शिवशंकर हॉटेलचे मालक बाळासाहेब चव्हाण, संचालक अनिल नांगरे, रमेश नांगरे, तानाजी जगताप, युवा नेते विजय कदम, मित्र प्रेम कलेक्शनचे अतुल नांगरे, अमोल नांगरे, सुनील भोसले, विनोद नांगरे, अमोल जगताप, सागर इंदलकर, सुधीर नांगरे, सागर भोसले, अक्षय भोसले, रोहन वाघमारे, समाधान शिंदे, वैभव भोसले,शुभम जगताप, सतीश जगताप, शरद जगताप, टेकाळे, इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार समारंभ करण्यात आला. सूत्रसंचालन सचिन चव्हाण यांनी केले तर आभार पत्रकार धनंजय भोसले यांनी मानले.

## रेल्वे स्टेशनवर सेल्फि विथ पीएम आणि सेल्फि विथ क्लिन इंडिया उपक्रम

**सोलापूर** : स्वच्छतेमुळे देशात अनेक बदल झालेले आहेत. याचीच माहिती अधिकाधिक लोकापर्यंत पोहोचविण्यासाठी केंद्रीय संचार ब्यूरोच्यावतीने रेल्वे स्टेशनवर ठेवण्यात आलेल्या सेल्फि विथ पीएम आणि सेल्फि विथ क्लिन इंडिया या फोटो बूथला जास्तीत जास्त लोकांनी भेट द्यावे असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी सुनील सोनटक्के यांनी केले.माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्यूरो सोलापूर यांच्यावतीने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव 'हर घर तिरंगा' आणि 'मेरी माटी मेरा देश' अभियानाच्या अनुषंगाने रेल्वे स्टेशन येथे आयोजित केलेल्या मल्टीमीडिया प्रदर्शनात ठेवण्यात आलेल्या सेल्फि विथ पीएम आणि सेल्फि विथ क्लिन इंडिया उपक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी सोनटक्के बोलत होते. यावेळी अंकुश चव्हाण, पतंजली योगपीठाच्या केंद्रीय महिला प्रभारी सुधा अळळीमोरे, स्टेशन व्यवस्थापक सी एल मीना, सहायक व्यवस्थापक मनोज तिर्की आणि सहायक क्षेत्रीय प्रचार अधिकारी अंबादास यादव आदी मान्यवर उपस्थित होते. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवांतर्गत मांडण्यात आलेल्या प्रदर्शनी मध्ये सेल्फी बूथ ठेवण्यात आले आहे. सूत्रसंचालन आणि आभार अंबादास यादव यांनी केले.

## इंडियन बँकेची शाखा सुरु करण्याची आ. सातपुते यांची मागणी

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे इंडियन बँकेची स्थापना करण्याची मागणी आमदार रामभाऊ सातपुते यांनी केली आहे. आ. रामभाऊ सातपुते यांच्याकडे पिलीव येथील पत्रकारांनी राष्ट्रीयकृत बँकेची एक शाखा असल्याने पिलीव परीसरातील नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे, अशी मागणी केली असता आमदारांनी पत्रकारांच्या मागणीची दखल घेत इंडियन बँकेची स्थापना करण्याची मागणी केली आहे. याबाबत पिलीव ही मुख्य बाजारपेठ आहे. पिलीव हे सातारा-पंढरपूर महामार्गावरील मुख्य गाव आहे. याठिकाणी व्यापारी, नोकरदार असल्याने मोठा आर्थिक व्यवहार चालू असतात. याठिकाणी बँकेची शाखा झाल्यास शेतकरी, व्यापारी, नोकरदार यांना फायदा होईल तसेच विदयार्थी शिष्यवृत्ती, शेती अनुदान, कर्मचारी वर्ग, पगार यासाठी या बँकेचे मोठे सहकार्य लाभेल. तरी पिलीव याठिकाणी आपल्या बँकेची शाखा स्थापन करावी, अशी मागणी आ. रामभाऊ सातपुते यांनी केली आहे. आमदार रामभाऊ सातपुते यांनी पत्रकारांच्या मागणीची दखल घेऊन नवीन बँकेच्या स्थापनेसाठी पाठपुरावा केल्याबद्दल पिलीव पत्रकार संघाच्यावतीने आमदार रामभाऊ सातपुते यांचे अभिनंदन केले जात आहे.

## केम येथे टॉमीने मारहाण तरुण जखमी

**सोलापूर** : केम (ता.करमाळा) येथे माझ्याकडे सारखे का बघतो ? अशी विचारणा केल्याच्या कारणावरून टॉमी, लोखंडी रॉड याने केलेल्या मारहाणीत तुषार संतोष गायकवाड (वय १९) हा तरुण जखमी झाला. ही घटना बुधवारी दुपारच्या सुमारास घडली. त्याला करमाळा येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याला दशरथ हरिभाऊ गाडे आणि अन्य दोघांनी मिळून मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

## आस्था रोटी बँकेच्यावतीने मंद्रुप येथील विद्यार्थिनींना सायकल वाटप



**सोलापूर** : आस्था रोटी बँकेच्यावतीने मंद्रुप येथील मातोश्री मागासवर्गीय आश्रम शाळेतील विद्यार्थिनींना सायकल वाटप करण्यात आली. ज्या विद्यार्थिनींना रोजसहाकिलोमीटर पायी प्रवास करून शाळेत जावे लागत होते अशा तीन विद्यार्थिनींना आस्था रोटी बँकेचे सल्लागार राजू हौशेट्टी यांच्या हस्ते सायकलींचे वाटप करण्यात आले. यावेळी आस्था रोटी बँकेचे संस्थापक विजय छचुरे, नीलिमा हिरेमठ, जगदीश कोरे, पुष्कर पुकाळे, अरुण निंबाळकर, आश्रम शाळेचे सचिव रावसाहेब राठोड, अधीक्षक कविता राठोड व विद्यार्थी उपस्थित होते.

## सखुबाई धांडोरे यांचे निधन



**वेळापूर** : वेळापूर ग्रामपंचायतीच्या कर्मचारी सखुबाई हनुमंत धांडोरे यांचे हृदय विकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, नातवंड असा परिवार आहे. त्या वेळापूर ग्रामपंचायत सरपंच रजनीश बनसोडे यांच्या चुलत बहीण होत.

# इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंट्स ऑफ इंडियातर्फे नॅशनल कॉन्फरन्सचे आयोजन

**सुराज्य/सोलापूर**

**सोलापूर शाखा पश्चिम विभागीय कार्यालयाचे अंतर्गत इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंट्स ऑफ इंडिया यांच्याकडून अध्यक्ष सीए शांतकुमार हिरेमठ यांनी राष्ट्रीय पातळीवरचे प्रत्यक्ष कर संमेलन घेण्याचे ठरविले आहे. अशा प्रकारचे राष्ट्रीय पातळीवरचे संमेलन सोलापुरात प्रथमच होत आहे. या संमेलनास प्रोफेशनल डेव्हलपमेंट कमिटी व डायरेक्ट टॅक्स कमिटीकडून मंजुरी घेऊन १८ व १९ ऑगस्ट रोजी दमानी नगर येथील वेदा बँकेट येथील हॉलमध्ये नॅशनल कॉन्फरन्स आयोजन करण्यात आले असल्याची माहिती अध्यक्ष सीए शांतकुमार हिरेमठ यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

या कॉन्फरन्ससाठी ४८५ जणांनी नोंदणी केली आहे. या कॉन्फरन्सचे उद्घाटन आमदार प्रणिती शिंदे, उद्योगपती व शिक्षण सम्राट मेहुल पटेल यांच्या हस्ते होणार आहे. तसेच या नॅशनल कॉन्फरन्सचा मुख्य हेतू आयकर कायद्याअंतर्गत करण्यात येणाऱ्या टॅक्स ऑडिट, आयकर विवरणपत्र, आयकरातील दंडात्मक तरतुदी व आयकर कायद्यातील अपीलचे काम करताना सीए व कर सल्लागार यांना येणाऱ्या अडचणी व शंका संबंधित चर्चा आणि समाधान करण्यात येणार आहे. या संमेलनास सोलापूर शाखेस कोल्हापूर, सांगली, लातूर, गुलबर्गा शाखेकडून आणि बीड व बागलकोट या चाप्टर्सकडून पाठिंबा दिला आहे. आतापर्यंत या कार्यक्रमास आयसीएआय डायरेक्ट टॅक्स कमिटीचे उपाध्यक्ष सीए पियुष छाजेड, पश्चिम भारत विभागीय कार्यालयाचे चेअरमन सीए अर्पित काबरा, पश्चिम भारत विभागीय कार्यालयचे खजिनदार सीए केतन सैय्या यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे. या दोन दिवसीय कॉन्फरन्समध्ये विविध विषयांवर चर्चा सत्र होणार असल्याचे अध्यक्ष सीए हिरेमठ यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेतस सीए रितेश चंपक, सीए आनंद पेशवे, अरुण नह्वा, समर्थ देशपांडे आदी उपस्थित होते.

# फोटोग्राफर बहुउद्देशीय संघातर्फे उद्या पुरस्कारांचे वितरण

**सुराज्य/सोलापूर**

जागतिक छायाचित्र दिनानिमित्त फोटोग्राफर बहुउद्देशीय संघ शहर व जिल्हा सोलापूर यांच्यामार्फत शनिवार दि. १९ ऑगस्ट रोजी शिवस्मारक सभागृह येथे सकाळी ११ वाजता शहरातील व जिल्ह्यातील जेष्ठ फोटोग्राफर्सना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याची माहिती अध्यक्ष श्रीकांत शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जीवनगौरव पुरस्कार कार्यक्रमास आमदार प्रणिती शिंदे, ट्रॅव्हल्स फोटोग्राफीची छायाचित्रकार महेंद्र बाकळे यांची उपस्थिती राहणार आहे. तसेच फोटोग्राफरच्या दहावी, बारावीतील गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात येणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस आरिफभाई काझी, किरण सदाफुले, आनंद भोसले, शब्बीर शेख, श्रीकांत भंडारे आदी उपस्थित होते.

**हे आहेत पुरस्काराचे मानकरी**

यावेळी नरसिंग सादुल (जीवन गौरव पुरस्कार), लतीफ कादरी (मीना फोटो), वासु गंभीरे, राहुल बिडकर, दिलीपराव विधाते (मोहोळ), महेश कविटकर, इलाही पटेल (नागणसूर), विलास सदाफुले आदी ज्येष्ठ छायाचित्रकारांचा पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे.

# सुधाकरपंतांकडून सहकारी क्षेत्राला भरारी देण्याचे कार्य : वाडेकर महाराज

## स्व. सुधाकरपंतांना अनेक मान्यवरांकडून आदरांजली



**सुराज्य/श्रीपूर**

स्व. सुधाकरपंत परिचारिक यांनी विविध संस्थांची निर्मिती करून त्या सक्षम बनवून सहकारी क्षेत्राला भरारी देण्याचे मोठे कार्य केले असल्याचे प्रतिपादन युवा कीर्तनकार ह.भ.प. चैतन्य महाराज वाडेकर यांनी केले. ते माजी आमदार व पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या तृतीय पुण्यस्मरण निमित्त वाखरी येथे कीर्तन सोहळ्यात बोलत होते.

यावेळी जिल्ह्यातील विविध राजकीय, सामाजिक व संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करून आदरांजली वाहिली. यावेळी पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन प्रशांत परिचारक, खा. जय सिध्देश्वर महास्वामी, दामाजीचे चेअरमन शिवानंद पाटील, उमेश परिचारक, रोहन परिचारक, माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, प्रणव परिचारक , मिलिंद परिचारक, व्हा. चेअरमन कैलास खुळे, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी, दिनकरराव मोरे, डी. पी. रोंगे, समाधान काळे, दाजी पाटील, वसंतराव देशमुख, कारखान्याचे सर्व संचालक आदी मान्यवर उपस्थित होते. स्व. सुधाकरपंत परिचारक यांच्या पुण्यस्मरणदिनानिमित्त पांडुरंग परिवाराच्यावतीने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात असंख्य कार्यकर्त्यांनी रक्तदान केले. दिनदर्शिका प्रकाशन व विविध सामजिक उपक्रम राबवण्यात आले होते.

पुढे बोलताना हभप चैतन्य महाराज वाडेकर म्हणाले, 'माणूस हा नावाने नाहीतर कर्तृत्वाने ओळखला जातो, स्व. सुधाकरपंत परिचारक हे स्वतः बालब्रह्मचारी राहून संपूर्ण आयुष्य समाजासाठी जगले म्हणून त्यांना कर्मयोगी म्हणून संबोधले गेले व त्यांच्यात जनमाणसाने पांडुरंग पाहिला. अशाप्रकारे स्व. परिचारकांचा आदर्श घेऊन आपल्या जीवनात बदल घडवून एक चारित्र्यसंपन्न जीवन जगण्याचा सर्वांनी प्रयत्न करावा, असे आवाहन केले.

यावेळी अनेक उपस्थित मान्यवरांनी परिचारक यांच्या कार्यावर प्रकाश ज्योत टाकून उजाळा दिला. दुपारी १२ :३० वाजता आदरांजली व पुष्पांजली वाहिण्यात आली. ग्रामपंचायत व पांडुरंग परिवारातील सदस्यांनी गावामध्ये स्वर्गीय सुधाकरपंत परिचारक यांच्या प्रतिमाला आदरांजली वाहिली, श्रीपूर येथे कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पाडुरंग कारखाना प्रवेशद्वारासमोर स्व. परिचारक यांच्या प्रतिमेची ही पूजन ठेवण्यात आले होते.

# जिल्ह्यात ठिकठिकाणी स्वातंत्र्यदिन उत्साहात

**जिल्ह्यात शाळा, महाविद्यालये आणि विविध संस्थांमध्ये देशाचा ७७ व्या स्वातंत्र्यदिन विविध कार्यक्रमांनी व उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.**

### पांडुरंग साखर कारखाना, श्रीपूर

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यात भारताचा ७७ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रास्ताविक संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष आ. प्रशांतराव परिचारक यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. यानंतर कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यामध्ये सेवानिवृत्त झालेले कामगार कुलकर्णी श्रीकांत त्रिंबक, काकडे विजय वसंत, बाबर भारत सिताराम, पवार कालिदास दत्तू, गायकवाड अशोक हनुमंत, कांबळे नवनाथ साधू, साठे लक्ष्मण गुलाब, कुलकर्णी राजेंद्र रामचंद्र, कुलकर्णी रामचंद्र बाळकृष्ण, शिंदे रत्नाकर महादेव, भुसनर सुरेश वसंत, जाधव चंद्रकांत श्रीमंत, खरात बेगम सुखदेव या कामगारांचा कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी, कारखान्याचे संचालक यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन कामगारांचा सत्कार करण्यात आला.

### सेवालाल नगर, उत्तर सोलापूर

उत्तर सोलापूर तालुक्यातील सेवालाल नगर येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त सरपंच कमलाबाई लक्ष्मण राठोड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.शालेय विद्यार्थ्यांकडून विविध कवायतींचे सादरीकरण, ग्रामपंचायतीकडून १५ वित्त पंचायत समिती सेस निधींतून स्त्री जन्माचे स्वागत योजनेतून ११ महिलांना कीट, मागासवर्गीय निधीतून विधवा महिलांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. प्रणिता पृथ्वीराज राठोड १० वीत प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी उपसरपंच खेमसिंग राठोड, पृथ्वीराज राठोड, लक्ष्मण राठोड मेजर , मारुती राठोड, अनिल राठोड, तुकाराम पवार, सुखदेव राठोड, नेताजी वडजे ग्रामविकास अधिकारी काळे, ग्रा. शिपाई अर्जुन राठोड, परमेश्वर राठोड पोलीस पाटील, मुख्याध्यापक जाधव सर, स्वामी, आशा वर्कर, अंगणवाडी मदतनीस, बचत गट सी.आर.पी.यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

### इंग्लिश स्कूल, वेळापूर

इंग्लिश स्कूल ज्युनिअर कॉलेज व शिवतेज प्राथमिक शाळा वेळापूर येथे १५ ऑगस्ट दिन उत्साहात साजरा करण्यात आला. स्वातंत्र्यदिनानिमित्त सकाळी प्रशालेचे प्राचार्य आर. बी. पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी प्रशालेचे स्कूल कमिटी चेअरमन पी. एस. पाटील हे होते. शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष संजय देशपांडे, उपाध्यक्ष स्मिता पिसे, कोषाध्यक्ष दत्ता काटे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संतोष सावंत, सर्व सदस्य, मेजर इंगवले, मेजर शिंदे, उपस्थित होते. प्रास्ताविक प्रशालेचे पर्यवेक्षक शिवशरण पठाण यांनी केले. सायकल वाटप तसेच गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना वैष्णवी जनरल स्टोअर्स वेळापूर यांच्यावतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. शिक्षक पालक संघाच्यावतीने प्रशालेतील २००० विद्यार्थ्यांना जिलेबींचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे उपमुख्याध्यापक सुनील खंदारे, उपस्थित होते. सूत्रसंचालन देवकते यांनी केले. आभार सावळे बी. एस. यांनी मानले.



### ओंकार साखर कारखाना, पिलीव

ओंकार साखर कारखाना युनिट एक चांदापुरीचा १५ ऑगस्टचा ध्वजारोहण सोहळा कारखान्याचे संचालक प्रशांत बोत्रे- पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी कामगार व ऊस उत्पादकांना खाऊवाटप करण्यात भारतीय सेनेतून सेवानिवृत्त झालेले मोहन घोडके यांचा सन्मान बोत्रे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. जनरल मॅनेजर भीमराव वाघमोडे, चीफ इंजिनिअर तानाजीराव देवकते, शेतकी अधिकारी निकम, इंजिनिअर संजय खुडे, गणेश धायगुडे, शेतकरी रामभाऊ मगर, नितीन जाधव उपस्थित होते. विष्णू गोरे यांनी आभार मानले.

### कै. पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुल, अक्कलकोट

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सुरेखा कल्याणशेट्टी माध्य. व उच्च माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गिरीजामाता मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, वीर शिरीष कुमार बाल संस्कार केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र, नालंदा विद्यार्थी वसतीगृह यांच्यावतीने कै. पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सांगता समारंभ विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेच्या संचालिका रुपाली येणेगुरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख उपस्थित म्हणून ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, सीईओ रूपाली शहा, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सचिव भिमराव साठे, संचालक मुकुंद पत्की, विवेकानंद प्रतिष्ठानचे संचालक अशोक येणेगुरे, संचालक मल्लिनाथ मसुती, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे हे उपस्थित होते. या कार्यक्रमास प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, पर्यवेक्षक मोतीलाल चव्हाण, प्राथमिकचे मुख्याध्यापक सुरेश आवटे, निखिल भालेराव, बापूजी निंबाळकर, शिवानंद पुजारी, प्रा. खंडेराव घाटगे उपस्थित होते. सूत्रसंचालन कल्पना स्वामी व सलोनी शहा यांनी केले तर आभार निशीगंधा कोळी यांनी मानले.

### हिंदवी स्वराज्य, सोलापूर

श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान सोलापूर विभागातर्फे स्वातंत्र्यदिनानिमित्त हिंदवी स्वराज्य स्वातंत्र्य दिन पदयात्रा उत्साहात काढण्यात आली. या पदयात्रेत हिंदू युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.राष्ट्रध्वजास अभिवादन करून सोलापूर महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारापासून पदयात्रेस प्रारंभ झाला. प्रारंभी दादाश्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष उदयशंकर पाटील यांच्या हस्ते भगव्या ध्वजाचे पूजन झाले. सोलापूर महानगरपालिकेपासून सुरू झालेली ही पदयात्रा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रामलाल चौक, सरस्वती चौक, नवीवेस पोलीस चौकी, भागवत टॉकीजमार्गे छत्रपती श्री शिवाजी महाराज चौकात छत्रपती शिवरायांच्या मूर्तीजवळ विसर्जित झाली. हिंदवी स्वराज्य स्वातंत्र्य दिन पदयात्रा छत्रपती श्री शिवाजी महाराज चौकात आल्यानंतर छत्रपती श्री शिवरायांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

### महावितरण कार्यालय, सोलापूर

महावितरण सोलापूर शहर ई उपविभाग येथे ७७ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ई उपविभाग अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रदीप मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीताने तिरंगा झेंड्याला सलामी देण्यात आली. अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रदीप मोरे यांनी कर्मचाऱ्यांनी सुरक्षितता बाळगून, विना अपघात व चांगली ग्राहक सेवा देण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. शाखा कार्यालय औद्योगिक वसाहत येथे वृक्षारोपण करण्यात आले. अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रदीप मोरे, विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियन सोलापूर मंडळ अध्यक्ष सुनील काळे, उपविभागातील सहाय्यक अभियंता पुंडलिक कुंभार, एन. टी. मुजावर, प्रेम राठोड, अजिंक्य कुलकर्णी, कोमल सुरवसे, सुनंदा माशाळ, उपविभागातील कर्मचारी नीलकंठ कांबळे, श्रीराम सलवदे, रमेश कुंभार, किरणकुमार इरनाळे, नागराज सोनवणे, अमरनाथ शिंदे, जुल्फिकार शेख, अमोल धायगुडे, संतोष कुंभार, किर्तीकुमार वेळापुरे, एम. एम. करजगीकर, सोमनाथ कारंडे, लक्ष्मीकांत अचलेरे, दीपाली कांदे, दत्तात्रय गुंड, उमेश शेवाळकर, सतीश बिराजदार, मीनल भोसले, नंदकुमार मार्तंड, धानप्पा यादवाड, ईश्वर वळवी, रोहिदास डांगे, प्रदीप मुलादी, श्रीशैल विजापूरे, मल्लिनाथ मुन्नोळी, विनोद राऊत, नितीन कोळी, नबील शेख, अपेक्षा बहादुरे, संभाजी रुपनर, चंद्रकला शिंदे, सचिन कानडे, केदार सुतार तसेच उपविभागातील इतर जनमित्र, कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

### चपळगाव प्रशाला

ग्रामीण विद्या विकास विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय आणि ग्रामीण विद्या विकास सेमी इंग्लिश स्कूल चपळगाव येथे ७७ वा स्वातंत्र्य दिनानिमित्त संस्थाध्यक्ष रविकांत पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.सामुहिक शपथविधी घेण्यात आले.कार्यक्रमाचे अध्यक्ष रविकांत पाटील यांनी स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. उपस्थित विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी सेमी इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम सादर केले. या राष्ट्रीय उत्सवामध्ये सचिव प्रभाकर हंजगे, कार्याध्यक्ष पंडीत पाटील, सर्व सन्माननीय संस्था संचालक गण, सेवानिवृत्त प्राचार्य हिरेमठ ,बसवणप्पा उटगे , सहशिक्षक पटेल ,म्हमाणे ,व नंदकुमार पाटील, संजय बानेगाव,अबुजर पटेल,परममंगल उद्योग समूहाचे ओमकार पाटील, बसवराज बंडगर,प्राचार्य मूली ,पर्यवेक्षक माने ,दरेकर ,निलकंठ पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन विजापूरे व एम.के. पाटील यांनी केले व आभार दुलंगे यांनी मानले.


# नगरपरिषदांना 'वैशिष्ट्यपूर्ण' १० कोटींचा निधी मंजूर

सुराज्य/अक्कलकोट

**अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील अक्कलकोट, दुधनी, मैंदर्गी या तिन्ही नगरपरिषद भागात विविध विकास कामांसाठी एकूण १० कोटी रुपयांची निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली आहे.**

अक्कलकोट मतदार संघात अक्कलकोट शहर, दुधनी व मैंदर्गी या तिन्ही मोठ्या नगरपरिषदा आहेत. त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा व त्याचा अनुशेष भरून निघावा यासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी नगरविकास खात्याकडे पत्र देऊन पाठपुरावा केला होता अखेर त्यास यश येऊन तिन्ही नगरपरिषद मिळून तब्बल १० कोटी रुपये मंजूर झाले आहेत.

ज्यात अक्कलकोट नगरपरिषद ४ कोटी ८५ लाख, दुधनी नगरपरिषद १ कोटी ४५ लाख तसेच मैंदर्गी नगरपरिषद ३ कोटी %० लाख रुपये रकमेचा समावेश आहे.मंजूर कामे व रक्कमा याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.



### अक्कलकोट नगरपरिषद क्षेत्रातील कामे

हन्नुर चौक ते वेताळ चौक रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व दोन्ही बाजूस गटार बांधणेसाठी १ कोटी,हन्नुर चौक ते संभाजीराजे चौक ते खासबाग रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व दोन्ही बाजूस गटार व सुशोभीकरण करणेसाठी १ कोटी,परिचारक घरापासून-कांदा बजार व कांदा बजार परिसर कॉंक्रीटीकरण, गटार व सुशोभीकरण करणेसाठी १ कोटी, इंदिरा नगर झोपडपट्टी व हरवाळकर गल्ली अंतर्गत रस्ता कॉंक्रीटीकरण व गटार बांधणेसाठी ५० लाख,जोशी भोजनालय,जैन समाज मंदिर, सापटणेकर घर ते कुलकर्णी घर ते जोगी विहिरपर्यंत कॉंक्रीटीकरण करणे व दोन्ही बाजूस गटार बांधणेसाठी %५ लाख, खंडोबा मंदिर परिसर अंतर्गत कॉंक्रीटीकरण करणे व गटार बांधणे ६० लाख असे एकूण ४ कोटी ८५ लाख रक्कमेचा समावेश आहे.


### मैंदर्गी नगरपरिषद क्षेत्रातील कामे

मैंदर्गी शहर ता. अक्कलकोट श्री. शिवचलेश्वर तलाव ते शिवचलेश्वर हायस्कुल मुतारी पर्यंत नाला बांधकाम करणे १कोटी ५० लाख,मराठा स्मशानभुमीमध्ये सोयी सुविधा करणे ३० लाख, हालहळ्ळी (मैं) रोड वरील मरगम्मा मंदिर ते हिरतोट घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता व एका बाजूस भुमीगत गटार करणेसाठी २० लाख,धानप्पा गुंडद घर ते हनुमान मंदिर पर्यंत कॉंक्रीट रस्ता व एका बाजूस भुमीगत गटार करणे २० लाख, मैंदर्गी न.पा. संकुल क्र.१ व्यापारी गाळ्यांच्या पाठीमागे कॉंक्रिट रस्ता करणेसाठी १कोटी ५० लाख असे एकूण ३ कोटी %० लाख अशा कामाचा समावेश आहे.

## लक्ष्मी दहिवडी हायस्कूलच्या मुख्याध्यापकाविरुध्द ॲट्रॉसिटीचा गुन्हा

**लक्ष्मि दहिवडी** : मंगळवेढा तालुक्यातील लक्ष्मी दहिवडी येथील विद्यामंदिर हायस्कूलचे मुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांनी शिपाई अर्जून सोनवले यांना जातीय मानसिकतेतून हजेरी मस्टर सहीसाठी उपलब्ध करुन न दिल्याप्रकरणी आरोपी मुख्याध्यापक बाबासाहेब धोंडीबा रड्डी,पर्यवेक्षक बाळासाहेब रावसाहेब जुंदळे या दोघाविरुध्द अनुसूचित जाती कलमान्वये गुन्हा दाखल झाला आहे.

यातील फिर्यादी शिपाई अर्जुन सोनवले हे अनुसूचित जाती जमातीचे असून ते लक्ष्मी दहिवडी येथील विद्यामंदिर हायस्कूल वर शिपाई या पदावर अनुकंपा तत्वानुसार पात्र असून या पदावर येण्यापूर्वी वरील आरोपींने फिर्यादीची नेमणूक होवू नये म्हणून आटोकाट प्रयत्न केले होते. परंतू आंदोलन, उपोषण सारख्या सनदशीर मार्गाचा अवलंब करुन जि.प.शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचेकडील आदेशाने शिपाई पदावर कार्यरत झालो होतो. वरील आरोपी तेव्हांपासून फिर्यादीवर चिडून होते. दि. १ नोव्हेंबर ते २३ डिसेंबर २०२२ दरम्यान वरील आरोपींनी संगनमत करुन कर्तव्यावर हजर असताना जातीय मानसिकतेमधून त्रास देण्याच्या उद्देशाने हजरे मस्टर सहीसाठी उपलब्ध करुन दिले नाही, तसेच या कालावधीत गैरहजर नोंद घेण्यात आली. पर्यवेक्षक आरोपीला गैरहजर बाबत नोटीस बजावण्याचे अधिकार नसताना चुकीच्या पध्दतीने नोटीस पाठविली. नोकरीस धोका उत्पन्न करण्याच्या उद्देशाने खोटी व खोडसाळ माहिती वरिष्ठ कार्यालयात सादर केली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास वरिष्ठ पोलीस अधिकारी करीत आहेत.



## वडील आणि आजींच्या स्मरणार्थ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**सांगोला** : एकाकिकडे आजची तरुणाई आपल्या आई वडील आणि वृद्ध आजी आजोबांना विसरू लागली असताना कडलास ता सांगोला येथील गिरीश गायकवाड पाटील आणि निशिकांत गायकवाड पाटील या दोन बंधूंनी आपल्या दिवंगत वडील आणि आजींच्या स्मरणार्थ काडलास केंद्रात प्रथम आलेल्या तीन गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून तरुणाई पुढे आदर्श निर्माण केला आहे.

छत्रपती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष स्व प्रकाश भानुदास गायकवाड पाटील आणि त्यांच्या मातोश्री रजाक्का भानुदास गायकवाड या दोन्ही माय लेकरांचे गतवर्षी दुःखद निधन झाले होते. त्यांच्या स्मृती आणि त्यांनी केलेले कार्य चिरंतन ठेवण्यासाठी स्व प्रकाश गायकवाड पाटील यांचे दोन चिरंजीव गिरीश पाटील आणि निशिकांत पाटील यांनी छत्रपती शिक्षण प्रसारक मंडळाचे कडलास हायस्कूल कडलासच्या केंद्रात प्रथम आलेल्या तीन गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल श्रीफळ फेटा स्मृतीचिन्ह तसेच उत्तेजनार्थ बक्षीस देऊन सन्मानित केले. यावेळी सरपंच दिगंबर भजनावळे, उपसरपंच विजय ननवरे, ग्रामपंचायत सदस्य निलेश माने, प्रशांत साळुंखे, बंडू लवटे, निलेश अनुसे यांच्यासह सुनील पाटील, दत्ता टापरे, गोरख गायकवाड, राहुल पाटील, संग्राम गायकवाड, चंद्रकांत शिंदे, राजू गव्हाणे, महेश गायकवाड, सचिन चव्हाण, दिलीप जाधव, पोलीस पाटील रघुनाथ ननवरे, ग्रामसेवक श्री ताटे, गाव कामगार तलाठी औदुंबर लिगाडे, मुख्याध्यापक दत्तात्रय गायकवाड, यांचे सह मान्यवर नागरिक उपस्थित होते

## लोकमंगल कृषिदूतांकडून पडसाळीत जनावरांचे मोफत लसीकरण शिबीर

**उ. सोलापूर** : ज्या जनावरांच्या मेहनतीवर शेतकऱ्याचे जीवन अवलंबून असते शिवाय दुभती जनावरामुळे शेती व्यवसायास पूरक साथ मिळत असते अशा जनावरांना लंपी संसर्गाचा वाढणारा धोका लक्षात घेऊन पडसाळी उत्तर सोलापूर येथे ११०० जनावरांचे मोफत लसीकरण लोकमंगलच्या कृषी दूताच्या वतीने करण्यात आले. कृषीदूत व पडसाळी ग्रामपंचायतयांच्या सयुंक्त विदयमाने आयोजित करण्यात आले होते. गावातील जनावरांचे लंपी संसर्गापासून संरक्षण होऊन शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे. यावेळी पडसाळी ग्रामपंचायतीचे सरपंच समाधान रोकडे, उपसरपंच ज्योतिराम पाटील, सदस्य अजित सिरसट, लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सचिन फुगे,प्रा.ज्ञानसगर सुतार, प्रा.आकाश अवघडे, डॉ. सोनवणे जीवन, डॉ. ओंकार साठे, डॉ. नाना पवार, डॉ.महादेव दुधाळे, बाळासाहेब काशीद, आंबादास कांबळे, संतोष साठे उपस्थित होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी लोकमंगल कृषी महाविद्यालयातील कृषिदूत प्रसाद जमदाडे, महेश गरजे, प्रणित भोसले, चैतन्य खारे, रोहित जावीर, संकेत देवर्षी, अभिजीत अवताडे यांनी परिश्रम घेतले.



## युवक काँग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्षपदी सागर राठोड

**उ. सोलापूर** : उत्तर तालुक्यातील गूळवंची येथील सागर सुरेश राठोड यांची सोलापूर जिल्हा युवक काँग्रेसच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवडीचे पत्र आमदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते, महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी सोलापूर जिल्हा अध्यक्ष सुनंजय पवार, महाराष्ट्र युवक काँग्रेस प्रदेश सचिव प्रवीण जाधव, युवक काँग्रेसचे जिल्हा पदाधिकारी नितीन शिंदे,आरिफ पठान यांच्यासह युवक काँग्रेसचे जिल्हा व तालुकास्तरीय पदाधिकारी उपस्थित होते.



## वेळापूर ग्रा.पं.च्या वतीने धांडोरे यांना श्रध्दांजली

**वेळापूर** : वेळापूर ग्रामपंचायतच्या सफाई कर्मचारी आयु. सखुबाई हनुमंत धांडोरे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांना वेळापूर ग्रामपंचायतीच्या वतीने आदरांजली वाहण्यात आली. यावेळी वेळापूर ग्रामपंचायतचे सरपंच रजनीश बनसोडे, मार्केट कमिटीचे माजी संचालक दादाराजे घाडगे. माजी उपसरपंच जावेद मुलाणी ग्रामविकास अधिकारी कैलास सुरवसे , ग्रामपंचायत सदस्य नानासाहेब मुंगूसकर चंद्रकांत पोळ, जवान माने देशमुख, बंडू घोरपडे, दादा मदडे ,रणजीत सरवदे व सर्व ग्रामपंचायतचे कर्मचारी उपस्थित होते.



## डॉ. खरात प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

**श्रीपूर** : येथील डॉ. साईप्रसाद उत्तम खरात हे एम बी बी एस एम डी मेडिसिन प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. ते श्रीपूर मधील पाहिलेच एमडी मेडिसिन प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले डॉक्टर ठरले आहेत. त्यांचे शालेय शिक्षण श्रीपूर येथील श्री चंद्रशेखर विद्यालयात झाले, वैद्यकीय शिक्षण डॉ.डी वाय पाटील मेडिकल कॉलेज मुंबई येथे झाले आहे. श्रीपुर येथील डॉ उत्तम खरात यांचे ते चिरंजीव आहेत. डॉ साईप्रसाद खरात यांनी सुयश मिळवल्याबद्दल त्यांचा भालचंद्र शिंदे पाटील, अकलूज एसटी आगारातील सेवानिवृत्त वहातुक सहाय्यक निरीक्षक अनिल दळवी, गौतम आठवले, बी टी शिवशरण यांनी त्यांचा व डॉ उत्तम खरात या पिता पुत्रांचा सत्कार करुन त्यांना शुभेच्छा दिल्या.



## पिरटाकळी येथे ३३ के. व्ही. उपकेंद्राला मंजुरी मिळावी

### आवताडे यांची उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी

विरवडे बु / प्रतिनिधी

कामती - विरवडे - टाकळी परिसरातील शेतकऱ्यांना पाण्याची उपलब्धता बऱ्यापैकी आहे. मात्र विजेचा तुटवडा नेहमीच शेतकऱ्यांना जाणवत आहे. यामुळे आडात असून देखील पोहऱ्यात येत नाही अशी परिस्थिती आहे. विद्युत वाहिनी व विद्युत रोहित्र यांच्यावर दबाव आल्यामुळे रात्री अपरात्री शेतकऱ्यांना विजेची कामे करावी लागतात. शिवाय अनेक वेळा स्वखर्चाने ट्रान्सफॉर्मर दुरुस्तीची कामे करावी लागली आहेत. यामुळे शेतकऱ्यांना नाहक आर्थिक फटका बसत आहे. म्हणून पीर टाकळी येथे ३३/११ के. व्ही. उपकेंद्राला मंजुरी द्यावी अशी मागणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष अंकुश आवताडे यांनी केली.

सोलापूरहून सांगोल्याकडे मार्गस्थ झाले असता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी सिनाई ॲग्रो टुरिझम अँड रिसॉर्ट येथे सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा अंकुश अवताडे व उद्योजक लहू अवताडे यांनी सत्कार केला.

यावेळी जिल्हाध्यक्ष आ.सचिन कल्याणशेट्टी व आ.समाधान आवताडे यांनी यांच्यासह जिल्हा परिषद माजी सभापती राहुल शिरसागर, कामती खुर्द चे उपसरपंच विठ्ठल माळी, विरवडे बु.चे सरपंच बाबासाहेब अंकुश, बाळासाहेब पाटील, प्रगतशील बागायतदार ज्ञानेश्वर पाटील, सुखदेव पाटील, भीमराव शिंदे, गोविंद काळे, संताजी बेंद्रे, सिध्देश्वर पाटील, प्रताप कांबळे, संकेत अवताडे, जयेश अवताडे, पांडुरंग अंकुश, किसन अंकुश, महेश कांबळे, सौदागर कांबळे अजित कांबळे व पंचक्रोशीतील लोक उपस्थित होते.

## माळीनगरच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

सुराज्य/माळीनगर



अखिल भारतीय माळी समाज प्रबोधन व शिक्षण संस्था पुणे यांचे वतीने माळीनगर येथील इ.१० वी व इ.१२ वी मधील माळी समाजातील गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींना अकलूज येथील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ.संभाजी राऊत यांच्या हस्ते रोख पारितोषिक,प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

फेब्रुवारी-मार्च २३ मध्ये झालेल्या बोर्ड परीक्षेत येथील दि मॉडेल विविधांगी प्रशालेतील इ.१० वीतील मोसमी प्रवीण बोरावके (प्रथम),संचित रितेश पांढरे(द्वितीय),कार्तिक विनायक गिरमे (तृतीय); तर इ.१२ वी बोर्ड परीक्षेतील प्रज्ञा राजाराम शिंदे (प्रथम), आकांक्षा गजानन म्हेत्रे (द्वितीय), आरती शशिकुमार माळी(तृतीय); आणि गुलमोहर इंग्लिश मेडियम मधील इ.१० वी बोर्ड परीक्षेतील निनाद गितेश पांढरे (प्रथम),मयूर प्रीतम पेटकर(द्वितीय) ओम अमित एकतपुरे(तृतीय); या विद्यार्थ्यांचा पारितोषिके देवून सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाप्रसंगी दि सासवड माळी शुगर फॅक्टरीचे चेअरमन राजेंद्र गिरमे, मॅनेजिंग डायरेक्टर सतीश गिरमे,संचालक निखिल कुदळे, विशाल जाधव, शुगरकेन सोसायटीचे चेअरमन अमोल ताम्हाणे, संचालक सुरेश राऊत, सासवड माळी एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त चंद्रकांत जगताप,व्हा.चेअरमन नितीन इनामके, सेक्रेटरी प्रकाश गिरमे,संचालक अजय गिरमे,ड.सचिन बधे,कल्पेश पांढरे,दिलीप इनामके,संचालिका ज्योतीताई लांडगे, ॲड आदिनाथ भगत आदि विविध संस्थांचे पदाधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## सहाय्यक सरकारी अभियोक्तापदी ॲड. कोळेकर यांची निवड



**वेळापूर** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत सहाय्यक सरकारी अभियोक्ता वर्ग १ या पदी निवड उघडेवाडी वेळापूर येथील ॲड. सौ अक्काताई श्रीरंग बडरे (सौ. अश्विनी महेश कोळेकर) यांची नुकतीच निवड झाली आहे. सध्या त्या माळशिरस येथील न्यायालयात विशेष सहाय्यक सरकारी वकिल म्हणून कार्यरत असून आज पर्यंत अनेक फौजदारी खटल्यात सरकारतर्फे महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्याशिवाय त्यांनी यापूर्वी आटपाडी व माळशिरस येथे खाजगी वकिल म्हणून ही काम पाहिले आहे. प्रदीर्घ अनुभवाचा व परिश्रमाचा त्यांना या यशात फायदा झाला आहे. त्या उघडेवाडी येथील सेवानिवृत्त शिक्षक मधुकर बिरा कोळेकर यांच्या स्नुषा व ॲड. महेश मधुकर कोळेकर यांच्या पत्नी आहेत. सदर यशा करीता त्यांना कोळेकर आणि बडरे परिवाराचे सहकार्य मिळाले.

## आ. सातपुते यांच्या प्रयत्नातून ५ कोटींचा निधी

सुराज्य/नातेपुते

माळशिरस तालुक्यातील विविध विकास कामांसाठी आ राम सातपुते यांनी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील व आ. रणजीतसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील विविध विकास कामांसाठी २५/१५ योजनेअंतर्गत ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याने माळशिरस तालुक्यातील जनतेतून समाधान व्यक्त केले जात आहे.



राज्य सरकारकडून भरीव निधीची तरतूद करण्यात आ राम सातपुते सतत प्रयत्नशील असतात . तालुक्यातील विविध विकास कामांसाठी ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा करिता ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला असून यामध्ये तालुक्यातील बागेचीवाडी, गिरवी, दहिगाव,पाणीव, लोणंद, गुरसाळे, फडतरी, पिलीव ,तांबेवाडी, सवतगव्हाण, मेडद, विजय वाडी, झिंजेवस्ती, गिरझणी, मोरोची,बोंडले, रेडे, कचरेवाडी, खंडाळी, धानोरे, बिजवडी, उघडेवाडी, कन्हेर, कारुंडे, गणेशगाव, तांबवे, माळीनगर, चौंडेशवरवाडी, पिसेवाडी, हनुमानवाडी, धर्मपुरी, दत्तनगर खंडाळी, फळवणी, सुळेवाडी, डोंबाळवाडी(कु) , कोंडबावी, लोंढेमोहितेवाडी या ३७ गावांच्या विविध विकास कामांसाठी रस्ते, पिण्याची पाणी टाकी, स्मशानभूमी दुरुस्ती, पेविंग ब्लॉक बसवणे , संरक्षक भिंत, सभामंडप आदी कामांना ५ कोटीचा निधी मंजूर झाला आहे.

यामध्ये बागेचीवाडी, तांबेवाडी, सवतगव्हाण, मेडद, विजयवाडी, झिंजेवस्ती, गिरझणी, मोरोची, बोंडले, कचरेवाडी, खंडाळी, धानोरे, बिजवडी, उघडेवाडी, कण्हेर, कारुंडे, गणेशगाव, तांबवे, माळीनगर, चौंडेश्वरवाडी, पिसेवाडी, हनुमानवाडी, धर्मपुरी ,दत्तनगर खंडाळी, फळवणी, सुळेवाडी, डोंबाळवाडी, कोंडबावी, लोंढे मोहितेवाडी या गावांसाठी प्रत्येकी १० लाख रुपये निधी मूलभूत सुविधा करता मंजूर झाला असून, गिरवी व फडतरी साठी ४० लाख रुपये , दहिगाव २५ लाख रुपये,पाणीव , लोणंद व रेडे या गावासाठी २० लाख रुपये, गुरसाळे ३० लाख रुपये, पिलीव १५ लाख रुपये असा एकूण पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

## रिपब्लिकन पक्षाची माळशिरस येथे तालुका बैठक

सुराज्य/वेळापूर



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले माळशिरस तालुका कार्यकारणीची बैठक माळशिरस येथील शासकीय विश्राम गृह येथे माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

याप्रसंगी रिपाइं राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा पंढरपूर-सांगोला दौऱ्यावर येणार असल्या बाबत तसेच माळशिरस रिपब्लिकन पक्ष आपल्या दारी अभियान घेऊन गावभेट दौऱ्याच्या माध्यमातून तालुक्यामध्ये रिपब्लिकन पक्ष मजबूत करून शाखा उद्घाटन करणे, क्रियाशील सभासद वाढविण्याबाबत चर्चा करण्यात आली.

यावेळी प. महा. उपाध्यक्ष एन के साळवे, प महा.सचिव दयानंद धाईंजे, जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले,जिल्हा नेते तुकाराम बाबर,भारत आठवले,नितीन मोरे,एस एम गायकवाड,आबा बनसोडे,रमेश धाईंजे, तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे,सरचिटणीस मारुती खांडेकर,कार्याध्यक्ष समाधान भोसले, कोषाध्यक्ष समीर सोरटे, युवक तालुका सरचिटणीस प्रवीण साळवे,ता उपाध्यक्ष शेखर सावंत,उपाध्यक्ष राम कांबळे उपाध्यक्ष महादेव गायकवाड, युवकचे संतोष चंदनशिवे,युवक ता उपाध्यक्ष बाबुराव भोसले, सचिव दादासाहेब सरतापे, प्रकाश कांबळे,वैभव बनसोडे,विश्वजीत भालशंकर,ग्रा प सदस्य हनुमंत वायदंडे,गणेश साठे, अंकुश मंडले,सुरज कांबळे,इत्यादी उपस्थित होते.

# अक्कलकोटमध्ये १० वर्षातील गर्दीचा उच्चांक

सुराज्य/अक्कलकोट

सलग सुट्यांमुळे गेल्या आठ दिवसात श्रीक्षेत्र अक्कलकोटला येणाऱ्या वाहनांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. सुमारे ७५ हजार वाहने येवून गेली असून गेल्या दहा वर्षातील गर्दीचा उच्चांक मानला जात आहे.

राज्यासह परराज्य, परदेशातील स्वामी भक्तांची संख्या अधिक वाढत चालल्याने दररोजची गर्दी श्रींच्या दर्शनाकरिता वाढत चालली आहे. सदरच्या आलेल्या वाहनांना श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे पार्किंग वगळता अन्य कोठेही प्रशस्त वाहनतळ नसल्याने सोलापूर बायपास रोड, कमलाराजे चौक, श्री शहाजी प्रशाला परिसरसह मिळेल त्या ठिकाणी दुतर्फा वाहने उभी करण्यात आलेली होती. याबरोबर मोठ्या प्रमाणात एसटी स्टँड परिसर, वटवृक्ष मंदिर, मैंदर्गी रोड, अन्नछत्र मंडळ परिसर, हत्ती तलाव, बासलेगाव रोड, थडगे मळा रोड, नगरपालिका परिसर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी पहायला मिळाली. वळसंग येथील टोलच्या गणनेनुसार सदर वाहनांची ये-जा गणनेनुसार सुमारे ७५ हजार वाहनांची नोंदली आहेत. वाढते वाहनांचे प्रमाण पाहता त्याप्रमाणे सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याची मागणी स्वामी भक्तांतून होत आहे.




विक्रमी गर्दीमुळे आलेल्या स्वामी भक्तांना राहणेसाठी खोल्या मिळाल्या नाहीत. निवासाची भक्त निवास, यात्री निवास, यात्री भुवन हाऊसफुल्ल झाले. त्यामुळे अनेक भक्तांना निवासासाठी सर्वत्र फिरावे लागल्याचे चित्र होते. अवास्तव वाहनामुळे वाहतुक व्यवस्था सुरळीत हाताळण्याकामी वाहतुक पोलिसांना दमछाक झाले. नियमित होत चाललेली वाहनांची गर्दी पाहता प्रशस्त वाहनतळ, स्थानिक रिक्षावाल्यांना वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळणे, ठरलेल्या ठिकाणीच रिक्षांचा थांबा याबरोबरच रिक्षाचालकांची अरेरावी थांबली पाहिजे. या सर्व बाबी गर्दीच्या निमित्ताने समोर आलेली आहे. आता श्रावण महिना सुरु झाल्याने सर्वच दिवस पवित्र मानले जातात. अधिक मासापेक्षा श्रावण मासात देखील दुपटीने गर्दी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्या अनुषंगाने प्रशासनाकडून वेळीच पावले उचलण्याची मागणी होत आहे.अन्नछत्र मंडळ ते देवस्थान जाणारा रस्ता मोकळा करण्याची मागणी स्वामी भक्तांतून होत आहे.

# गवंडी कामगाराचा मुलगा अमेरिकेत शिकणार



✔ सुराज्य/बारामती

घरची आर्थिक परिस्थिती हालाखीची, वडील अशिक्षित असल्याने गवंडी कामगार. मात्र, शिक्षणाची आवड, मनात जिद्द आणि कठोर परिश्रम करण्याची तयारी ठेवल्याने बारामतीतील शंकर रामचंद्र चव्हाण हा युवक आता थेट अमेरिकेत उच्च शिक्षण घेणार आहे. शंकर हा आयआयटी गुवाहाटीमधून पदवी घेऊन एम. एस. या उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला रवाना होत आहे. अनेक मुलांमध्ये आदर्श निर्माण करेल अशीच शंकरची कहाणी आहे.

तेलंगणा राज्यातून उपजीविकेसाठी रामचंद्र चव्हाण हे बारामतीत कामानिमित्त स्थायिक झाले. बारामतीत ते गवंडी काम करू लागले. गवंडीकाम करता करता त्यांनी मुलगा शंकर याला शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन दिले. आपण स्वतः अशिक्षित आहोत परिस्थितीमुळे शिक्षण घेता आले नाही. मात्र, आपल्या मुलांनी उच्च शिक्षण घ्यावे आणि आयुष्यात मोठे व्हावे, आपले नाव कमवावे अशी त्यांची इच्छा होती. तसेच दररोज काम केले तरच प्रपंच चालेल, अशी रामचंद्र चव्हाण यांची स्थिती होती.

मात्र, अशा प्रकारच्या प्रतिकूल आर्थिक परिस्थितीतूनही ते मुलाला शिकवत राहिले. त्यांचा मुलगा शंकर हा ही तितकाच खडतर परिश्रम करणारा आहे. शंकरनेही आपल्या परिस्थितीची जाणीव ठेवत मन लावून अभ्यास केला आणि आयआयटी गुवाहाटीमधून इलेक्ट्रॉनिक्स व टेलीकम्युनिकेशनची पदवी मिळवली.

अत्यंत हुशार असलेल्या शंकरला अमेरिकेत न्यूयॉर्क येथे उच्च शिक्षणासाठी संधी मिळाली असून आज तो पुढील उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला रवाना होत आहे.

# आता त्यांच्या दावणीला जाऊन बसता

## शरद पवारांनी फटकारले



✔ सुराज्य/बीड

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी पक्षातील फुटीनंतर पहिल्यांदा बीड जिल्ह्यात सभा घेतली. या सभेत शरद पवार यांनी केंद्रातील भाजप आणि राज्यातील एकनाथ शिंदे यांच्या सरकारच्या कारभारावर टीका केली. यावेळी त्यांनी धनंजय मुंडे आणि इतर नेत्यांचं नाव न घेता टीका केली. शरद पवार म्हणाले, 'यशवंतराव चव्हाणांच्या काळात असाच एक प्रसंग आला होता. लोकं संभ्रमात होते. त्यावेळी केशरकाकू क्षीरसागर यांनी ठाम भूमिका घेतली होती. तशीच भूमिका त्यांचे नातू संदीप क्षीरसागर यांनी घेतली, असं शरद पवार म्हणाले.'**

देशाची सत्ता चमत्कारीक लोकांच्या हातात आहे. जात, धर्म आणि भाषेच्या आधारावर लोकांमध्ये अंतर कसं वाढवता येतील, अशी नीती सत्ताधाऱ्यांची आहे. पेट्रोल डिझेलच्या किमती कुठं गेल्यात हे तुम्हाला माहिती आहे, असं शरद पवार यांनी म्हटलं.

त्यांनी यावेळी मणिपूर आणि ईशान्य भारतातील राज्यांच्या प्रश्नांवरुन केंद्र सरकारवर टीका केली. केंद्रातील सत्तेच्या जोरावर गोवा, महाराष्ट्र, मध्य प्रदेशातील सरकार पाडलं गेलं. स्थिर सरकार देतो म्हणता आणि केंद्राच्या सत्तेच्या जोरावर लोकांनी निवडून दिलेली सरकारं पाडतात, अशी टीका शरद पवार यांनी केली. कालच्या निवडणुकीत लोकांनी भाजपचा पराभव केला. भाजपचा पराभव करुन तुम्ही सत्तेत आलात. आज भाजपच्या दावणीला जाऊन बसायची भूमिका घेत आहेत. आज तुम्ही हे करत आहात, उद्याच्याला ज्यावेळी मतदान करायची संधी लोकांना मिळेल. त्यावेळी कोणतं बटन दाबायचं आणि तुम्हाला कुठं पाठवायचं हा निकाल या जिल्ह्याचा मतदार केल्याशिवाय राहणार नाही, असं शरद पवार म्हणाले.

### थोडी माणुसकी ठेवा, नाहीतर लोक धडा शिकवतील

जिल्ह्याचे नेते काय झालं त्यांना माहिती नाही, एका नेत्यानं सांगितलं, एक आमचा सहकारी हा पक्ष सोडून गेला, चौकशी केली काय झालं, कालपर्यंत ठीक होता, नाही म्हणले त्यांना कुणीतरी सांगितलं, काय सांगितलं, कुणी सांगितलं, त्यांना सांगितलं अमरसिंह पंडितांनी, नाही म्हणले आता पवार साहेबांचं वय झालंय, आपल्याला भविष्याचा विचार करायचा असेल तर दुसरा नेता निवडावा लागेल, माझं वय झालं म्हणता तुम्ही माझं काय बघितलंय, तुम्हाला सामुदायिक शक्ती उभी केल्यावर काय होतं हे जिल्ह्यानं बघितलं आहे. अनेकांचे पराभव इथल्या तरुण पिढीनं केले आहेत. तुम्हाला सत्तेच्या बाजूनं जायचंय तर जा, पण निदान ज्यांच्याकडून आयुष्यात काही घेतलं असेल. त्यांच्याबद्दल थोडी माणुसकी ठेवायचा प्रयत्न करा, नाहीतर लोक धडा शिकवतील, असं शरद पवार म्हणाले.'

दिल्लीमध्ये नरेंद्र मोदींनी १५ ऑगस्टला लाल किल्ल्यावर मी पुन्हा येईन म्हटलं. राज्याचे एक होते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ते म्हणायचे मी पुन्हा येईन पण ते खालच्या रँकला आले. त्यामुळं तुम्ही पंतप्रधान पदाच्या खालच्या कुठल्या रँकला येणार याचा विचार करा, असा टोला शरद पवार यांनी लगावला.

# चंद्र काही पावलांवर

## चांद्रयान-३ मोहिमेतील ऐतिहासिक क्षण

✔ सुराज्य/नवी दिल्ली

भारताच्या महत्त्वाकांक्षी चांद्रयान-३ मोहिमेबद्दल एक मोठी अपडेट इस्रोकडून आले आहेत. चांद्रयान-३ चे प्रक्षेपण श्रीहरीकोटा येथून १४ जुलै रोजी करण्यात आले होते, त्यानंतर ५ ऑगस्ट रोजी चांद्रयान-३ने चंद्राच्या कक्षेत प्रवेश केला होता. आज चांद्रयान मोहिमेतील आणखी एक महत्त्वाचा टप्पा पार पडला.

चांद्रयान-३च्या प्रॉपल्शन मॉड्यूलपासून लँडर विक्रम वेगळे झाले आहे. आता लँडर विक्रम चंद्रावर लँड होण्यासाठी एकटेच प्रवास करेल. भारतीय अंतराळ संशोधनाचे पितामह विक्रम साराभाई यांच्या नावाने लँडरचे नाव विक्रम ठेवण्यात आले आहे. साराभाई यांना आज गर्व होत असेल. प्रॉपल्शन मॉड्यूलने लँडर विक्रमला त्याच्या योग्य ठिकाणी पोहोचवले.

जेव्हा प्रॉपल्शन मॉड्यूलपासून लँडर विक्रम वेगळे झाले त्यानंतर इस्त्रोने ट्विट करून ही माहिती दिली. इस्रोने लँडर विक्रमकडून प्रॉपल्शन मॉड्यूलचे आभार व्यक्त केले. इस्त्रोने Thanks for the ride, mate! असे ट्विट केले.

भारताच्या या मोहिमेवर संपूर्ण जगाचे लक्ष आहे. ही मोहिम यशस्वी झाली तर अमेरिका, रशिया आणि चीन यांच्यानंतर चंद्राच्या भूमीवर उतरणारा




होते. तेव्हा ७ सप्टेंबर २०२९ रोजी विक्रम लँडर सॉफ्ट लँडिंगच्या वेळी ब्रेकिंग प्रणालीत झालेल्या गडबडीमुळे चंद्राच्या भूमीवर क्रॅश झाले होते. इस्रोने २००८ साली चांद्रयान-१ मोहिम सुरु केली होती. गेल्या पंधरा वर्षातील भारताची ही तिसरी चंद्र मोहिम आहे.

# अदानींनी पुन्हा विकले ८,७०० कोटींचे शेअर्स

✔ सुराज्य/नवी दिल्ली



यूएस-आधारित शॉर्ट सेलिंग फर्म हिंडेनबर्ग रिसर्चने २४ जानेवारी रोजी अदानी समूहाचा अहवाल प्रसिद्ध केला. यामध्ये अदानी ग्रुपवर अनेक गंभीर आरोप करण्यात आले होते. अदानी ग्रुपने हे आरोप फेटाळून लावले परंतु या आरोपांमुळे ते चांगलेच हादरले आहेत. या हिंडेनबर्ग रिसर्चचे परिणाम अजूनही अदानी ग्रुपवर स्पष्ट दिसून येत आहेत. ग्रुपचे चेअरमन गौतम अदानी यांनी अनेक कंपन्यांमधील आपली हिस्सेदारी विकली आहे. बुधवारी अदानी कुटुंबाने अदानी पॉवरमधील आठ टक्क्यांहून अधिक स्टेक विकला.

पुन्हा एकदा राजीव जैन यांच्या नेतृत्वाखालील GQG Partners ने अदानी समूहामध्ये गुंतवणूक केली आहे. या अमेरिकन कंपनीने जानेवारीपासून अदानी ग्रुपमध्ये ३५,००० कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे.


अदानी कुटुंबाने बुधवारी सेकंडरी ट्रांजैक्शंसद्वारे ८,७०० कोटी रुपयांचे शेअर्स विकले. यातील अर्धा भाग GQG भागीदारांनी विकत घेतला होता. या कंपनीने आतापर्यंत अदानी समूहाच्या पाच कंपन्यांमध्ये गुंतवणूक केली आहे. अदानी पॉवर व्यतिरिक्त, अदानी एंटरप्रायझेस, अदानी ग्रीन, अदानी ट्रान्समिशन आणि अदानी पोर्ट्समध्ये त्यांचे स्टेक आहेत. यासोबतच कंपनीची अंबुजा सिमेंट्समध्येही भागीदारी आहे.

मात्र, त्यांनी हा भागभांडवल अदानी कुटुंबाकडून विकत घेतलेला नसून थेट बाजारातून विकत घेतला आहे. बुधवारी मार्केट बंद होताना अदानी पॉवरचे शेअर्स २७९ रुपयांवर होते.

# एसटीचे अपघात वाढले; गाड्यांचीही स्थिती बिकट

✔ सुराज्य/मुंबई

राज्याची जीवनवाहिनी असलेल्या एसटी गाड्यांची स्थिती अत्यंत वाईट झाल्याने अपघातांमध्ये वाढ होत आहे. २०२२-२३ आर्थिक वर्षात राज्यात एसटीचे एकूण चार हजार ६५९ अपघात झाले आहेत. यात ३४३ नागरिकांचा मृत्यू झाला, तर तीन हजार ५८४ जण जखमी झाले आहेत. मागील पाच वर्षांतील हे सर्वाधिक अपघात असल्याचे एसटी महामंडळाच्या वार्षिक अहवालातून स्पष्ट झाले आहे.



यंदा अपघातांची संख्या वाढली असली तरी अपघाती मृत्यू आणि जखमींच्या आकड्यांवर नियंत्रण ठेवण्यास महामंडळाला यश आले आहे. एसटी अपघातात यंदा मृत्यू आणि जखमींची संख्या करोनापूर्व काळाच्या तुलनेत कमी झाली असून, प्रवाशांसाठी ही दिलासादायक बाब आहे.

सन २०२२-२३ आर्थिक वर्षात २८३ प्राणांतिक आणि एक हजार ३६२ गंभीर अपघात नोंदवण्यात आले आहेत. किरकोळ अपघातांची संख्या तीन हजार १४ आहे. एसटीच्या ३४३ अपघातबळींमध्ये २२ प्रवासी, तर १२ एसटी कर्मचारी आणि ३०९ अन्य नागरिकांचा समावेश आहे.

एसटी गाड्यांची स्थिती अत्यंत वाईट आहे. यामुळे गाड्यांचा ब्रेक न लागणे, स्टेअरिंगचा रॉड तुटणे, इंजिनमध्ये बिघाड यामुळे अपघात होतात. मानवी चुकांमुळे होणाऱ्या अपघातांचे प्रमाण अधिक आहे. यामुळे अपघातांमध्ये वाढ होत आहे, असा महामंडळाचा दावा आहे.

## ▶▶ महत्त्वाचे वृत्त...

### दारूचे अतिव्यसन कुटुंबासाठी क्रूरताच

✔ **छत्तीसगड** : पती-पत्नींच्या वादाची आणि विभक्त होण्याची असंख्य कारणे असतात. त्यापैकीच एक म्हणजे मद्यपानाचे अतिसेवन. पती जर सातत्याने मद्याच्या नशेत राहत असेल तर ती पत्नीसाठी मानसिक क्रूरताच असते, असं स्पष्ट मत छत्तीसगड उच्च न्यायालयाने नोंदवलं आहे. कौटुंबिक जबाबदारी झटकून जो पती सतत मद्यपान करत असेल तर मुलांचं आणि पत्नीचं मानसिक संतूलन बिघडू शकतं, असं न्यायालयाने म्हटलं आहे. पत्नी गृहिणी असेल आणि तिच्या संपूर्ण कुटुंबाचा भार जर पतीवर म्हणजेच घरातील कर्त्या पुरुषावर असेल तर त्याने जबाबदाऱ्या टाळू नयेत, असं न्यायमूर्ती गौतम भादुरी आणि न्यायमूर्ती संजय एस. अग्रवाल यांच्या खंडपीठाने म्हटलं आहे.

### कोर्टाच्या निर्णयांमधून ४० शब्द वगळले

✔ **नवी दिल्ली** : सर्वोच्च न्यायालयाने एक महत्त्वाचा आणि मोठा निर्णय घेतला आहे. Prostitute, Hooker, Whore, Keep, Mistress, Slut असे चाळीस शब्द आपल्या नव्या हँडबुकमधून वगळले आहेत. कुठल्याही न्यायालयांना निर्णय देत असताना हे शब्द आता यापुढे वापरता येणार नाहीत. फक्त इंग्रजी शब्दच नाहीत तर या शब्दांचे अर्थ, समान अर्थ असलेले शब्दही न्यायालयाच्या निर्णयांमध्ये वापरता येणार नाहीत. असे शब्द वापरुन लैंगिक पूर्वग्रह वाढीस लागणं होऊ नये आणि न्यायाधीशांनी न्यायदान करताना संवेदनशीलपणे निर्णय द्यावा, म्हणून हे पाऊल उचलण्यात आलं आहे.

### अमेरिकेतील विवाह व्यवस्था धोक्यात?

✔ **वॉशिंग्टन** : कोणत्याही विवाहित जोडप्यासाठी घटस्फोट ही एक मानसिक तणावाची आणि वेदनादायक बाब ठरते. त्यामुळे विवाहसंस्थेवर मोठं प्रश्नचिन्ह हल्लीच्या काळात उपस्थित केलं जाऊ लागलं आहे. अमेरिकेतील विवाह व्यवस्थेसंदर्भात फोर्ब्सनं नुकत्याच केलेल्या एका सर्व्हेमधून काही धक्कादायक तपशील समोर आले आहेत. त्यामुळे एकंदरीतच अमेरिकेतील विवाह व्यवस्था धोक्यात आली आहे का? असा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. या सर्व्हेमध्ये अमेरिकेत होणाऱ्या घटस्फोटांमागचं सर्वात मुख्य कारणही मांडण्यात आलं आहे.

### दुसरे ओरिजिनल गीत 'हूडी' लाँच

✔ **सोलापूर** : दुसरे ओरिजिनल गीत 'हूडी' लाँच झाले आहे. रॉयल स्टॅग बूमबॉक्स व्हायकॉम १८ सोबत सहयोगाने संगीताची पूर्तता: नवीन शैली सादर करण्यास सज्ज आहे, रीलीज करण्यात येणाऱ्या दुसऱ्या ओरिजिनल गाण्यामध्ये बॉलिवूड गायिका निकिता गांधी आणि रॅपर बाली या डायनॅमिक जोडीच्या अद्वितीय संयोजनाचा समावेश आहे. नवीन गाणे 'हूडी'मध्ये बॉलिवूड व हिप-हॉपचे विलक्षण संयोजन आहे.

### ४६ लाखांचे अंमली पदार्थ जप्त


✔ **पुणे** : कोकेन, मेफेड्रोनची विक्री करणाऱ्या एका महिलेसह तिघांना गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने पकडले. मुंढवा भागात ही कारवाई करण्यात आली. आरोपींकडून ४६ लाख ५९ हजार रुपयांचे कोकेन, मेफेड्रोन जप्त करण्यात आले.

# आदर्श घोटाळाप्रकरणी मानकापेला घेतले ताब्यात

✔ सुराज्य/छ. संभाजीनगर

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था घोटाळा प्रकरणात सुनील अंबादास मानकापे याला विशेष तपास पथकाने ताब्यात घेतले. कोर्टाने सुनील मानकापे याला आठ दिवसांची पोलीस कोठडीचे आदेश दिले.

या प्रकरणात विशेष तपास पथकाचे प्रमुख पोलीस निरीक्षक संभाजी पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेविरुद्ध एकूण २०२ कोटी २४ लाख ६३ हजार ९६० रुपयांचा अपहार झाल्याचे प्रकरण समोर आले. या प्रकरणात उपनिबंधक विभागाच्यावतीने



सिडको पोलीस ठाण्यात दोन विविध गुन्हे दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणात १५ ऑगस्ट रोजी संचालक मंडळातील सुनील अंबादास मानकापे पाटील (वय ५१, रा. एन ६, सिडको) याला विशेष तपास पथकाने ताब्यात घेतले. या आरोपीला न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने सुनील अंबादास मानकापे याला २२ ऑगस्टपर्यंत आठ दिवसांची पोलीस कोठडी दिली.

# सोलापुरातील नवीन इलेक्ट्रिक स्कूटर उपलब्ध

✔ सुराज्य/सोलापूर

भारतातील सर्वात मोठी इलेक्ट्रिक वाहन कंपनी ओला इलेक्ट्रिकने त्यांच्या बहुप्रतिक्षित एस१ एअर इलेक्ट्रिक स्कूटरसाठी खरेदी विंडो उघडण्याची घोषणा केली आहे. स्कूटर आता १५ ऑगस्टपर्यंत ग्राहकांना १,०९,९९९ रुपयाच्या प्रास्ताविक किमतीत खरेदीसाठी उपलब्ध आहे. सोलापुरातील ग्राहक नवीन एस १ एअर इलेक्ट्रिक स्कूटर उपलब्ध असून आवश्यक असलेली माहिती मिळविण्यासाठी रेल्वे लाईन्स आणि रंगराज नगर येथील दोन ओला अनुभव केंद्रांना भेट देऊ शकता.

# तुळजाभवानीच्या दर्शनाला 'बापल्योक' चित्रपटाची टीम

✔ सुराज्य/मुंबई

वडील मुलाच्या नात्याची हळूवार गोष्ट घेऊन २५ ऑगस्टला आपल्या भेटीला येणारा नागराज मंजुळे यांची प्रस्तुती असलेला 'बापल्योक' हा मराठी चित्रपट सध्या त्याच्या ट्रेलर आणि गीतांमुळे चांगलाच गाजतोय. नुकतीच या चित्रपटाच्या टीमने तुळजापूरच्या तुळजाभवानी आईचे दर्शन घेऊन चित्रपटाच्या यशासाठी प्रार्थना केली. विशेष म्हणजे 'बापल्योक' या चित्रपटाचे शूटिंग तुळजापूर परिसरातील असून, चित्रपटातील बहुतांशी कलाकार तुळजापूर, सोलापूर परिसरातील आहेत. मकरंद माने या चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत. चित्रपटात वडिलांच्या भूमिकेत ज्येष्ठ अभिनेते शशांक शेंडे असून त्यांच्या मुलाची भूमिका विठ्ठल काळे यांनी साकारली आहे. या दोघांसोबत अभिनेत्री पायल जाधव, नीता शेंडे चित्रपटात दिसणार आहेत. 'नाईंटीनाईन प्रोडक्शन्स'चे विजय शिंदे आणि बहुरूपी प्रोडक्शन्स'च्या शशांक शेंडे आणि मकरंद माने यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. मनापासून केलेली चांगली कलाकृती प्रेक्षकांपर्यंत पोहचते. 'बापल्योक' चित्रपटाच्या ट्रेलर आणि गीताला मिळलेला प्रतिसाद हेच दाखवून देतो.

# 'श्रीमद् रामायण' छोट्या पडद्यावर अवतरणार

✔ सुराज्य/सोलापूर

आजच्या काळातही प्रासंगिक ठरणारी मूल्ये, तत्वे आणि आयुष्यभरची शिकवण देणाऱ्या प्राचीन आध्यात्मिक युगात भारतीय कुटुंबांना घेऊन जात सोनी एंटरटेनमेंट टेलिव्हिजन प्रभू श्रीरामाची महागाथा 'श्रीमद् रामायण' अस्सल व सर्वात शुद्ध रूपात साकारण्याची घोषणा केली आहे. स्वस्तिक प्रॉडक्शन्सची निर्मिती असलेली ही सर्वात भव्य पौराणिक मालिका जानेवारी २०२४ मध्ये छोट्या पडद्यावर अवतरणार आहे. 'श्रीमद रामायण' येतेय, फक्त सोनी एंटरटेनमेंट टेलिव्हिजनवर.

# कळव्यात जमिनीवर उपचार करण्याची वेळ



✔ सुराज्य/उल्हासनगर

उल्हासनगर येथील मध्यवर्ती जिल्हा रुग्णालयात सध्या क्षमतेहून अधिक रुग्ण दाखल आहेत. या रुग्णांवर उपचार करण्यासाठी रुग्णालयाची यंत्रणा तोकडी पडत आहे. खाटांची संख्या अपुरी असल्याने दाखल रुग्णांना जमिनीवर झोपून उपचार घ्यावे लागत असून रुग्णांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. त्यामुळे अनेक रुग्णांना जागेअभावी इतर रुग्णालयांत उपचारांसाठी जाण्याचा सल्ला रुग्णालयाकडून दिला जात असल्याचं रुग्ण सांगत आहेत. रुग्णांची फरफट आणि दाखल रुग्णांचे हाल पाहून नातेवाईक रुग्णालयात प्रशासनाविरोधात संताप व्यक्त करत आहेत.

उल्हासनगर शहरातील शासकीय मध्यवर्ती जिल्हा रुग्णालय कल्याण ग्रामीण ते कसारा आणि वांगणीपर्यंतच्या गरीब रुग्णांसाठी उपयुक्त ठरते. त्यात शहरात पालिकेचे रुग्णालय नसून आरोग्य केंद्रे बंद पडली आहेत. त्यामुळे शहरातील रुग्णांचाही भार या रुग्णालयावर पडतो. अंबरनाथ, मुरबाड भागातील अपघात, दुर्घटना आणि जखमी रुग्णांनाही येथे दाखल करण्यात येते. रुग्णांचा भार वाढत असताना रुग्णालयाला अनेक समस्यांनी घेरले असून या समस्यांकडे रुग्णालयात प्रशासन दुर्लक्ष करत आहे.

# आई-वडिलांचा सांभाळ न केल्यास वारसा नोंद रद्द होणार

## वीज-पाणीही गायब; या गावाचा निर्णय

✔ सुराज्य/कोल्हापूर

आई-वडिलांना सांभाळा, त्यांची काळजी घ्या... नाही तर महसूल विभागाची परवानगी घेऊन ग्रामपंचायतीच्या दफ्तरी असलेली वारसा नोंद रद्द करण्यात येईल, असा निर्णय (कोल्हापूर जिल्ह्यातील माणगाव) ग्रामस्थांनी घेतला आहे. शिवाय नवीन वारसा नोंद करतानाही 'आई-वडिलांची काळजी घेईन, तसे न झाल्यास कारवाईस पात्र राहीन,' अशा

### असे आहे प्रतिज्ञापत्र...

'मी माझ्या आई-वडिलांचा सांभाळ करीन. त्यांना दवाखाना अथवा आरोग्याच्या बाबतीत इतरत्र कोणतीही कमतरता भासू देणार नाही. मी माझ्या कर्तव्याचे पालन करीन. माझ्याकडून या सर्व गोष्टींचे पालन झाले नाही, अशी तक्रार आली किंवा शेजाऱ्यांकडून माहिती घेतल्यानंतर माझ्या कर्तव्यात कसूर झाल्याचे आढळल्यास ग्रामपंचायतीच्या दफ्तरात 'असिसमेंट'ला लागलेले नाव तत्काळ कमी करण्यात यावे; तसेच माझ्या घरी असलेले नळ कनेक्शन खंडित करण्यात यावे. याबाबत मी, कोठेही कोणतीही तक्रार करणार नाही,' अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र माणगाव ग्रामपंचायत लिहून घेणार आहे.



आशयाचे प्रतिज्ञापत्र लिहून घेतले जाणार आहे. त्याचे पालन केले नाही, तर वारसा नोंद रद्द करण्याबरोबरच पाणी, वीज या मुलभूत सुविधादेखील न पुरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राजर्षी शाहू महाराज यांच्या पुढाकाराने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत माणगाव येथे परिषद झाली होती. त्यामुळे या गावाला सामाजिक सुधारणेची मोठी परंपरा आहे. या गावात विधवांना सन्मान, सायंकाळी दोन तास टीव्ही व मोबाइल बंद ठेवण्याबरोबरच अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आणखी एक स्वागतार्ह पाऊल उचलण्यात आले.

आई-वडिलांच्या संपत्तीवर हक्क सांगणारी मुले उतारवायात त्यांचा सांभाळ करण्यात हयगय करताना दिसतात. वृद्धापकाळी निराधार मातापित्यांची हेळसांड करणाऱ्या प्रवृत्ती वाढत असल्याने समाजात ही चिंतेची बाब बनली आहे. या पार्श्वभूमीवर हातकणंगले तालुक्यातील मागणाव ग्रामस्थांनी सरपंच राजू मगदूम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ग्रामसभेत हा निर्णय घेतला. यासाठी महसूल विभागाची मान्यता ही घेण्यात येणार असून, त्याबाबत प्रस्ताव पाठवण्यात आला आहे.

### माणगाव ग्रामस्थांचा निर्णय

▶ आई-वडिलांना सांभाळणाऱ्या मुला-मुलींनाच वडिलोपार्जित संपत्तीचे वारस हक्क. ▶ वारसा नोंदीसाठी येणाऱ्या व्यक्तीकडून प्रतिज्ञापत्र घेण्यात येणार आहे. ▶ प्रतिज्ञापत्रानुसार न वागल्यास कारवाई म्हणून त्याची वारसा नोंद रद्द केली जाणार. ▶ माणगाव ग्रामस्थांनी घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयामुळे चुकीच्या पद्धतीने वागणाऱ्या मुलांना चाप बसेल. सरकारच्या महसूल विभागाने याबाबत परवानगी द्यावी; तसेच त्याची अमंलबजावणी राज्यात सर्वत्र व्हावी यासाठी आम्ही राज्य सरकारला पत्र पाठवले आहे.

**- डॉ. राजू मगदूम, सरपंच, माणगाव ग्रामपंचायत.**

# अमोल शिंदे आणि महापालिका अधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक चकमक

## नवी पेठ, शिंदे चौकात अतिक्रमण मोहीम

सुराज्य/सोलापूर

**महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक पथकाने गुरुवारी दुपारी नवी पेठ जवळील शिंदे चौक परिसरातील रस्त्यावरील अतिक्रमण हटाव मोहीम राबवली. यादरम्यान शिवसेनेचे जिल्हाप्रमुख माजी नगरसेवक अमोल शिंदे आणि अतिक्रमण विरोधी पथकाचे विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांच्यात चांगलीच शाब्दिक चकमक उडाली. सुमोर १५ ते २० मिनिटे दोघांमध्ये हमरीतुमरी झाली. अखेर महापालिका प्रशासनाने कारवाई करत येथील सहा खोकी जप्त केली.**






सोलापूर शहरात विविध ठिकाणी रस्त्यावर रहदारी अडथळा ठरणारे आणि फुटपाथ वरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम नियमितपणे, नियोजनपूर्वक राबविण्यात येत आहे. गुरुवारी दुपारी महापालिका अतिक्रमण विरोधी पथकाने नवी पेठ नजीकच्या शिंदे चौक येथील राष्ट्र विकास बालक मंदिर शाळेच्या पाठीमागील रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम पोलीस बंदोबस्तात हाती घेतली. यावेळी येथील खोकी धारकांनी स्वतःहून अतिक्रमण काढून घेऊ अशी भूमिका घेत जेसीबींच्या साह्याने अतिक्रमण हटविण्यास विरोध दर्शवला. दरम्यान याचवेळी माजी नगरसेवक अमोल शिंदे यांनीही आक्रमक भूमिका घेतली. अतिक्रमण आवश्य हटवा पण जेसीबीच्या साह्याने येथील खोके हटवू नका, यामुळे येथील विक्रेत्यांच्या आर्थिक नुकसान होणार आहे. स्वतःहून संबंधित विक्रेते ही खोकी काढून घेतील, अशी सूचना महापालिका अतिक्रमण विरोधी विभागाचे प्रमुख बनसोडे यांना केली. यावेळी महापालिका अधिकारी बनसोडे व शिंदे यांच्यात शाब्दिक चकमक उडाली. अतिक्रमण काढण्याची कारवाई महापालिका प्रशासनाला करावीच लागेल. काही खोकी काढली असताना इतर खोकीधारकांना स्वतःहून काढण्यास सवलत देणे चुकीचे ठरेल. आम्हाला आमचे कर्तव्य पार पाडू द्यावे, असे बनसोडे यांनी सांगितले. यावरून शिंदे- बनसोडे यांच्यात चांगलीच शाब्दीक चकमक उडाली. सुमारे १५ ते २० मिनिटे दोघांमध्ये वादावादी सुर होती. अखेर या रस्त्यावरील सहा खोकी महापालिका अतिक्रमण विरोधी पथकाने जप्त केली.

### स्वतःच्या घराचे अतिक्रमण का ठेवताः शिंदे

शहरातील इतर ठिकाणचे अतिक्रमण काढता स्वतःच्या घराचे अतिक्रमण का ठेवता असा आरोप यावेळी माजी नगरसेवक अमोल शिंदे यांनी बनसोडे यांच्यावर केला. महापालिकेच्या अनेक अधिकाऱ्यांनी अतिक्रमण केले आहे, तेथेही कारवाई करावी, असे अमोल शिंदे यांचे म्हणणे होते.

### ... तर मी स्वतः माझ्या घरावर बुलडोजर लावेन : बनसोडे

जर माझ्या घराचे एक इंच जरी अतिक्रमण आढळल्याचे पुराव्यानिशी सिद्ध केल्यास मी स्वतः बुलडोजर लावून ते अतिक्रमण पाडून टाकेन आणि खोटे असल्याचे सिद्ध झाल्यास संबंधितांवर कारवाई करेल असे स्पष्टीकरण अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख बनसोडे यांनी यावेळी दिले.

### अतिक्रमण केल्यास कारवाई तर होणारच : महापालिका

सोलापूर शहर अतिक्रमण मुक्त झाले पाहिजे. स्वच्छ सोलापूर - सुंदर सोलापूरसाठी शहरातील सर्व नागरिक, व्यापाऱ्यांनी महापालिका प्रशासनास सहकार्य करणे आवश्यक आहे. सोलापूर शहरात रस्त्यावर अडथळा ठरणारे तसेच फुटपाथवर अतिक्रमण कोणत्याही परिस्थितीत कोणीही करू नये अन्यथा महापालिका प्रशासनाकडून कारवाई करण्यात येईल, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

## जि.प.च्या जलजीवन विभागातील दोन टेंडर लिपिक निलंबित

**सोलापूर :** जिल्हा परिषदेच्या जलजीवन मिशन ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील अनिल पाटील, श्यामसुंदर समदुरले या दोन टेंडर लिपिकांना कर्तव्यात कसूर केल्या प्रकरणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी निलंबित केले.



मनीषा आव्हाळे यांनी पदभार घेतल्यानंतर केवळ एका महिन्याच्या आतच ही कारवाई करण्यात आली आहे. जलजीवन मिशन ही मोठी आणि लोकोपयोगी योजना असल्याने त्यांनी जल जीवन मिशनच्या कामकाजावर विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. जलजीवनच्या कामकाजात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप जिल्हा नियोजन सभेत आ.सुभाष देशमुख यांनी केला होता. याशिवाय इतर आमदारांनी आवाज उठवला होता. या आरोपावर चौकशी समिती नेमण्यात आली होती. त्या झालेल्या कामकाजात नियमिता झाल्याचा ठपका त्यांनी ठेवला होता. दरम्यानच्या काळात मनिषा आव्हाळे यांना प्रभारी सी .ई.ओ पदी कार्यरत असताना त्यांनी युद्ध पातळीवर प्रलंबीत जलजीवनचे कामे मार्गी लावले होती. अनिल पाटील आणि शामसुंदर ग्रा. पा.पू .कार्यरत असताना कर्तव्यात कसूर केल्याचे आढळून आल्याने त्यांना निलंबीत करण्यात आले आहे. अनिल पाटील हे बदलीने शिक्षण (माध्य) तर समदुरले हे बांधकाम (२) येथे कार्यरत आहेत. अशा प्रकारची बातमी जिल्हा परिषदेच्या आवारात सायंकाळी पसरतात संपूर्ण जिल्हा परिषद मध्ये खळबळ उडाली.

## कलबुर्गी-कोल्हापूर रेल्वेस सांगोला थांबा मंजूर

सुराज्य/सोलापूर



रेल्वे क्रमांक २२१५५ २२१५६ कलबुर्गी -कोल्हापूर-कलबुर्गी सुपरफास्ट एक्सप्रेस रेल्वेस सांगोला थांबा मंजूर केल्याचे पत्र सोलापूर रेल्वे विभागाचे वाणिज्य व्यवस्थापक एस व्ही देशपांडे यांनी शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेस कळविले आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून कलबुर्गी -कोल्हापूर- कलबुर्गी या एक्सप्रेस गाडीस सांगोल्यात थांबा नव्हता आणि प्रवाशांची मागणी व गैरसोय लक्षात घेता हा थांबा अधिक गरजेचे असल्याचे रेल्वे प्रशासनास निदर्शनास आणून दिले होते . त्याचबरोबर सांगोला शहर व तालुक्यातील सुमारे १० हजार सर्वसामान्य नागरिकांचे मागणी पत्र पोस्ट कार्डद्वारे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पाठवण्यात आले होते. याचीच दखल घेऊन रेल्वे प्रशासनाने येथील सर्वेक्षण करून सदरचा थांबा मंजूर केला. सदरच्या थांब्यास सांगोला स्टेशनचे मास्तर सत्येंद्रसिंह यांनीही दुजोरा दिला

### दोन वर्षात फक्त सांगोला थांब्यालाच मंजुरी

सोलापूर रेल्वे विभागाकडे गेल्या दोन वर्षात विविध ठिकाणी रेल्वेना थांबा मिळावा याकरिता अनेक निवेदने आलेली आहेत. ती अजूनही मंजुरीचे प्रतीक्षेत आहे पण केवळ शहीद अशोक कामटे संघटनेने सांगोला थांब्याचे मागणी पत्र, निवेदन आमच्या दिल्ली रेल्वे बोर्ड यांनी सर्व सकारात्मक गोष्टी विचारात घेता मंजूर केले आहे, असे विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांचे स्वीय सहाय्यक ताजुद्दीन यांनी सांगितले.

## दारू पिऊन फायटरने मारहाण; दोघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर :** ड्रायडे च्या दिवशी बियर शॉपी जवळ दारूच्या नशेत लोखंडी फायटरने केलेल्या मारहाणीत एक जण जखमी झाला. ही घटना होटगी (ता.दक्षिण सोलापूर) येथील पिंटू जाधव याच्या बियर शॉपी जवळ मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली.या प्रकरणात वळसांच्या पोलिसांनी दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे . यासंदर्भात युनुस अ.गफूर काजी (वय ४२ रा.होटगी ) या जखमीने पोलीसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी राहुल संजय सोनकडे आणि नागेश आमसिद्ध सोनकडे (दोघे रा.होटगी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.युनुस काजी हा १५ ऑगस्टच्या रात्री पिंटू जाधव याच्या हॉटेलमधे बियर पिण्यासाठी जात होता. त्यावेळी राहुल आणि नागेश हे दोघे दारूच्या नशेत आपसात भांडण करीत होते. भांडण कशाला करता अशी विचारणा काजी याने केली. त्यावेळी नागेश यांनी खिशातील फायटर काढून त्याला शिवीगाळ करीत डोळ्याजवळ मारले. तर राहुल याने त्याला लाथा बुक्क्याने मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार सहाय्यक फौजदार निंबाळे पुढील तपास करीत आहेत.

## सोलापुरात आता अजितदादा गटाचे स्वतंत्र कार्यालय

**दीपक साळुंखे यांच्यावर जबाबदारी निश्चित; उपमुख्यमंत्री पवार येणार सोलापूर दौऱ्यावर**

सुराज्य/सोलापूर



सोलापुरात शहर व जिल्हा राष्ट्रवादी अजित पवार गटाचे स्वतंत्र कार्यालय उभारण्यात येणार आहे. याची जबाबदारी माजी आमदार दीपक साळुंखे-पाटील यांच्यावर निश्चित करण्यात आली आहे.

दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार हे लवकरच सोलापूर दौर्यावर येणार असल्याची माहिती महापालिकेतील राष्ट्रवादीचे माजी गटनेते किसन जाधव यांनी दिली. माजी गटनेते किसन जाधव, माजी नगरसेवक नागेश गायकवाड आणि प्रदेश राष्ट्रवादी युवक सरचिटणीस चेतन गायकवाड यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मुंबई येथील शासकिय निवासस्थानी भेट घेऊन त्यांचा ट्रॉफी देऊन सन्मान केला. यावेळी राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील, राष्ट्रवादी प्रदेश युवक अध्यक्ष सूरज चव्हाण उपस्थित होते. राष्ट्रवादी पक्ष संघटना मजबूत करण्याबरोबरच आगामी महापालिका, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने जाधव व गायकवाड यांनी उपमुख्यमंत्री पवार आणि प्रदेशाध्यक्ष तटकरे यांच्याशी सविस्तर चर्चा केली. यावेळी उमेश जाधव, वीरेश सुतार, अजय नरवडे, महादेव राठोड, माऊली जरग, ऋषभ प्याटी उपस्थित होते.

### सोलापूरच्या विकासासाठी साकडे

महापालिकेतील राष्ट्रवादीचे माजी गटनेते किसन जाधव, माजी नगरसेवक नागेश गायकवाड व युवक सरचिटणीस चेतन गायकवाड यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सोलापूर शहराच्या विकासासाठी साकडे घातले. तसेच सोलापूरचा दौरा निश्चित करण्याची मागणीही केली. याला अजित पवारांनी सकारात्मकता दर्शवत लवकरच आपण सोलापूरच्या दौऱ्यांवर येणार असल्याचे सांगून सोलापूर शहराच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली.

## अंधश्रद्धा निर्मूलन समितीतर्फे रविवारी निर्भय मॉर्निंग वॉक

**सोलापूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सोलापूर शहर शाखेच्या वतीने रविवार दि. २० ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता निर्भय मॉर्निंग वॉक काढण्यात येणार असल्याची माहिती शहर कार्याध्यक्षा डॉ. अस्मिता बालगावकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून या मॉर्निंग वॉकला सुरुवात होणार आहे. पुढे डफरीन चौक, रेल्वे स्टेशन येथील महात्मा गांधी पुतळा पर्यंत जाणार आहे. निर्भय मॉर्निंग वॉक मध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती सोलापूर शहर शाखेसोबतच कर्मचारी व समविचारी संघटना सुद्धा सहभागी होणार आहेत. यावेळी सकाळी ६.४५ वाजता नरेंद्र दाभोळकर यांच्या १२ पुस्तिकांचा लोकार्पण समारोह प्रा. डॉ. अर्जुन व्हटकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तरी या कार्यक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शहर शाखेच्या कार्याध्यक्ष बालगावकर आणि प्रधान सचिव ब्रह्मानंद धडके यांनी केले आहे.

## शेटे नगर येथून दुचाकी पळवली

**सोलापूर :** शेटे नगर येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.डीएस.६०८१ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना दि.१५ ऑगस्ट रोजी दहा ते साडेदहा वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी सिद्धेश्वर गुलचंद आटपळकर (वय-२७,रा.मुक्ताई मंदिर जवळ,सोनी सिटी,सोलापूर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास मपोना.चौधरी या करीत आहेत.

## जिल्हा परिषदेच्या तब्बल २० कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा

**प्रतिनियुक्ती रद्द करून पूर्वीच्या ठिकाणी वर्ग**

सुराज्य/सोलापूर



सोलापूर जिल्हा परिषदेच्या तबबल २० कर्मचाऱ्यांना मुख्य कार्यकाऱ्यांवर अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी कारवाईचा भडगा उचलला आहे. वर्षानुवर्ष प्रति नियुक्तीवर काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ ठिकाणी वर्ग करण्यात आले आहे. त्यांची सेवा मुळ ठिकाणी वर्ग करण्यात आली असून प्रतिनियुक्तीमुळे विभागीय आयुक्त कार्यालयाकडून आस्थापनेत परिच्छेद लागल्याची बाब निर्देशनास आल्याने रद्द करण्यात आल्याची माहीती पत्रकार परिषदेत दिली.

या वीस कर्मचाऱ्यांमध्ये आर. पी. देशपांडे, ए. एन. भोसले, आर. एस घोडके, प्रदिप वि.सगट, एम.एस. काशेटटी, जी.टी. रेवे, पी. एन. मोरे, व्ही.आर. रणदिवे, एस. के. पोतदार, ए. व्ही. माळी, आर. के. गुरव, व्ही. एन. गाडे, एम. डी. चिंचोळे, एस. एस. माने, खदीरपाशा खाजानुर सय्यद, पाटील अनिल ज्ञानेश्वर, रविकांत भिमराव कोरे, सचिन एल. घोडके, एस.पी.बाणुर, प्रदीप सगट यांचा समावेश आहे. सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये अनेक असे कर्मचारी आहेत की ज्यांची सेवा एका ठिकाणी असताना ते मूळ ठिकाणी न थांबता प्रतिनियुक्तीवर आपल्या सोयींच्या ठिकाणी कामकाज करत आहेत. विभागीय आयुक्तांच्या परवानगी न घेता परस्पर पद्धतीने या कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्ती देण्यात आल्याचे समोर आले आहे. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी आव्हाळे यांनी पदभार घेताच केवळ एका महिन्याच्या आतच ही कारवाई सुरू केली आहे.

### आयुक्तांच्या परवानगीनेच प्रतिनियुक्ती देण्यात येणार

यापुढे विभागीय आयुक्तांच्या परवानगीनेच प्रतिनियुक्ती देण्यात येणार असून ज्या कर्मचाऱ्यांची तक्रार नाही. अशांनाच नियुक्त करण्यात येणार असल्याचेही आव्हाळे यांनी स्पष्ट केले. अजूनही अशा प्रकारचे कर्मचारी असल्याचे बोलले जात आहे परंतु मी शेवटपर्यंत याबाबतचा पाठपुरावा करणार आहे, असेही आव्हाळे यांनी सांगितले.

## शास्त्री नगरात हाणामारी; दहा जणांवर गुन्हा दाखल

सुराज्य/सोलापूर

तरुण मंडळांच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर अध्यक्षाला चहा एकास महागात पडले. हॉटेलसमोर शाब्दिक बाचाबाचीतून हाणामारी झाली. या नव्या अध्यक्षासह दोघे जखमी झाले. शास्त्री नगर येथील नुरदरिया हॉटेसमोर बुधवारी रात्री ११:१५ च्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणी पोलिसांनी दहा जणांविरुद्ध बेकायदेशीर जमाव जमवून शांततेचा भंग केल्याबद्दल गुरुवारी पहाटे गुन्हा नोंदला आहे.

या प्रकरणी सदर बझार पोलीस ठाण्याचे पोलीस रामा हरिदास भिंगारे यांच्यासह पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन भांडण आटोक्यात आणले. त्यांनी जमावातील दहाजणांविरुद्ध फिर्याद दिली. यात म्हटले आहे की, सत्तनाम चौक यजेथील महावीर तालीम तरुण मंडळाच्या नूतन अध्यक्षपदी बुधवारी संतोष मरेड्डी याची निवड करण्यात आली.

रात्री ११ च्या सुमारास अध्यक्ष संतोषने सर्वांना चहा पाजायला शास्त्री नगर येथील नुरदिया हॉटेलकडे आणले होते. यावेळी जमावातील नऊजणांचे अरबाज शब्बीर बेपारी यांच्यामध्ये शाब्दिक चकमक झाली. यातून हाणामारी सुरु झाली. यात संतोष मरेडडी व अरबाज बेपारी यांच्या नाकाला व चेहऱ्याला बाचाबाचीत जखम झाली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून तणावपूर्ण वातावरण आटोक्यात आणले. दहाजणांविरुद्ध बेकायदेशीर जमाव जमवल्याबद्दल गुरुवारी पहाटे गुन्हा दाखल केला. तपास हवालदार इनामदार करीत आहेत.

सदर बझार पोलिसांनी या प्रकरणी दर्गादास विजय म्हेत्रे, सागर दीपक कोरे, प्रशांत हिरालाल सोंडेकर, प्रथमेश संजय कोल्लूर, महेश रमेश कोरे, संतोष वसंत मरेड्डी, गणेश भारत रोकडे, पंकज संजय कोल्लूर, योगीराज राजू म्हेत्रे, अरबाज शब्बीर बेपारी (सर्व सत्तनाम चौक, सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदला आहे.

**श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे**
**कै. कल्याणराव (बाळासाहेब) इंगळे पॉलिटेक्निक, अक्कलकोट**
गट नं. ६०४/२, भक्त निवास जवळ, गाणगापूर रोड,
अक्कलकोट ४१३२१६, फोन नं. ०२१८१-२२१३२१
Web : swamipolytechnic.org, DTE Code D-6474
Email: swamipolytechnic@gmail.com

**प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षे पदविका अभियांत्रिकी प्रवेश २०२३-२०२४**

प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष CAP ROUND III साठी Option Form
ऑप्शन फॉर्म भरण्याची मुदत प्रथम वर्ष दिनांक १९/०८/२०२३ ते २२/०८/२०२३
थेट द्वितीय वर्ष दिनांक २३/०८/२०२३ ते २७/०८/२०२३

| Branches | Choice Code |
|---|---|
| Computer Engg. | 647424510 |
| Civil Engg, | 647419110 |
| Electronics & Telecommunication Engg. | 647437210 |
| Mechnical Engg. | 647461210 |

(शासनाच्या सर्व शिष्यवृत्ती योजना नियमानुसार लागू)
DTE मान्यता प्राप्त सुविधा केंद्र - FC 6474 मध्ये मोफत
Option Form भरण्याची सुविधा उपलब्ध.
रविवार व इतर सुट्टी दिवशी देखिल सुविधा केंद्र सुरु राहील.
प्रथम व थेट द्वितीय वर्षासाठी CAP Round मधून शिल्लक राहणाऱ्या Non CAP जागेसाठी अर्ज करण्यासाठी आजच संपर्क साधावा.

संपर्क : ७५८८२१४९४८, ७३८७८८२७९९

श्री. महेशजी क. इंगळे, चेअरमन
श्री. आत्माराम मा. घाटगे, सेक्रेटरी
श्री. एन.बी. जेऊरे, प्राचार्य



गुरूवारपासून श्रावण महिना सुरू झाला. पहिल्याच दिवशी सोलापूरचे ग्रामदैवत असलेल्या सिद्धरामेश्वर मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदादेखील भाविकांनी मोठ्या संख्येने दर्शनासाठी गर्दी केली आहे. श्रावणमासानिमित्त मंदिरात विविध कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे.